[काव्येतिहास-संग्रह.]

[१९.]

श्रीमंत भाऊसाहेब यांची कैफियत.

हें प्रकरण

अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपांसह

काशीनाथ नारायण साने बी. ए. (डेक्कन कॉलेज.)

यांणीं

प्रकाशित केलें.

चिमाजीसंज्ञस्य सुतः सदाशिव इति स्मृतः ।
स तु वीरः कलावस्मिन् जामदग्न्य इवाभवत् ॥

श्रीशिवकाव्ये १०–५७

शालिवाहन शके १८०९. राज्याभिषेक शके २१३.

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक

अभ्यास करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ अर्पण करितों.

ग्रंथ-प्रकाशक.

॥ श्री. ॥

श्रीमंत भाऊसाहेबांची कैफियत.

कैफीत श्रीमंत राजश्री सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब व विश्वासराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब. सुरूसन इहिदे शीतेन मया व अल्लफ. शके १६८२. विक्रमनाम संवत्सरे. सन ११७० फसली. या सालीं विजया दशमीचे मुहूर्तानें पुण्यानजीक वानवडीचे रोखें डेरे देऊन मुहूर्तानें उभयतां डेऱ्यास दाखल झाले. मातबर सरदारांस व शिलेदारांस पत्रें पाठविलीं. वरचेवर लोक जमा करून फौजेचे समजाविशीबद्दल एक महिना त्याच मुक्कामीं राहिले.

कार्तिक शुद्ध पक्षीं मुजाफरखानाचे नांवयानें कांहीं राजकारण जाणवून एकांतीं जावें असा रावता घातला. रविवारीं घात योजिला. कटार उजवे बाजूस चालविली. पुढें कलमदान होतें, शाई घ्यावयास हात पुढें केला, तो पुढें संधान चुकलें. किंचित् जखम श्रीमंतांस लागली. ते समयीं महिपतराव चिटणीस व शिदोजी कुंजीर व बळवंतराव बाबा व सटवाजी राऊत वगैरे प्रसंगीं होते, त्यांनीं यास धरून मुसक्या बांधिल्या. आणि त्यास पुशिलें की, " तूं हें कर्म कोणाचें बोलण्यावर केलें, हें सांगणें. " त्याजवरून त्यानें सांगितलें, कीं " नबाब निजामअल्ली यांचे सूत्र मुजाफरखान याजकडेस बहुत दिवस

---

१. हें प्रकरण रा० केशवराव सुंगठाणकर मु० पुणें यांजकडून मिळालें. हें उभ्याक्षरी चिकट बंदावर लिहिलेलें आहे. ३६ बंद शाबूद आहेत. ३६ वा बंद फाटला आहे. पुढें ११२ बंद असावे असा अदमास होतो. दुसरी प्रत या प्रकरणाची न मिळाल्यामुळें जीं कांहीं दुर्बोध स्थळें यांत आहेत तीं तशींच राहिलीं. ही 'कैफत' म्हणजे कैफियत कोणी कधीं लिहिली याचा निर्णय करवत नाहीं. तथापि पेशव्यांची शकावली पृष्ठ १७ टीप ६४ पहा.

या प्रकरणांत भाऊसाहेबांस मारेकरी घालून मारण्याचा प्रयत्न—उदगीरची मोहीम; पाणिपतची मोहीम हे विषय आहेत. अक्षर सुटें आहे. लिहिणारा देशस्थ ब्राह्मण किंवा दुसरा कोणी देशावरील राहिवासी असावा असें त्याच्या लिहिण्याच्या पद्धतीवरून वाटतें.

२. सु० सन इहिदे शीतैन मयां व अल्लफ =११६१=शके १६८२=सन इसवी १७६०. मूळांत " इहिदे तिसैन " असें आहे तें चुकीनें पडलें असावें.

३. " या सालीं " असें म्हटलें आहे तें बरोबर नाहीं. भाऊसाहेब शके १६८१ सालच्या दसऱ्यास-डेरेदाखल होऊन उदगीरची लढाई मारून पुढें फाल्गुनाच्या सुमारास दिल्लीकडे रवानाही होण्याच्या तयारींत होते. नंतर शके १६८२ च्या पावसाळ्यांत दिल्लीकडे छावणीस राहून पुढें त्याच सालच्या पौषांत पाणिपत झालें. पेशव्यांची शकावली पृष्ठ १७ पहा.

आहे जे, भाऊसाहेब मातबर कारभारी यास्तव कांहीं आपला उपाय चालत नाहीं. तरि त्यांस हरयत्नें करून जिवें मारावें. म्हणजे तुम्हांस एक लक्ष रुपयांची जागीर देतों. तुम्हीं याप्रमाणें हें काम आधीं करावें. सर्व प्रकारें ऊर्जित करितों. त्याजवरून मुजाफरखान बहुत दिवस यत्नामध्यें आहेत. आम्हांस त्यांनीं आपली लेक देऊं करून या उपायास लाविलें आहे. आम्ही तुम्हांपाशीं एकांतीं यावयाचा राबता घालून लटकीं राजकारणें सांगितलीं. अंतर्यामीं समय साधून काम करावें, म्हणोन कटार चालविली. त्यासमयीं तुमचे प्रतापें करून माझा हात कांपों लागला. कटार पुरती चालवावयास सामर्थ्य आलें नाहीं. आम्हांस तुम्हीं ठेवितां असा अर्थ नाहीं. मरण प्राप्त झालेंच आहे. झाली हकीकत आपणांस निवेदन केली." तेव्हां त्यास अभय देऊन दुसऱ्याचे बोलण्यावर तुजला कशास मारावें, खरें असेल तें सागणें, [असें बोलले.]

इतकें झालियावर बहुत लोक घाबरे होऊन सरदार वगैरे मंडळी थोर थोर पहावयास आले. तों मातोश्री गोपिकाबाईही परामृषास आलीं. मुजाफरखानही आले. तेव्हां मुजाफरखानाचें समाधान केलें कीं, तुजपासोन हें कर्म

---

४. मुझफरखान हा बुस्सी साहेब फरांशीस यांच्या लष्करांत कवाईत शिकविलेले शिपायांचा सरदार होता. तो १७५२ सालीं निघून पेशव्यांस सामील झाला व त्यास पेशव्यानें महादाजीपंत पुरंदऱ्याबरोबर १७५४ सालीं कर्नाटकांत पाठविलें. तेथें महादाजी पंतानें आपल्या बेहड्यांत हात घातला ह्याबद्दल राग येऊन तो म्हैसूरवाल्याकडे गेला. पण तेथें नीट न जमल्यामुळें तो सावनूरच्या नबाबास मिळाला. नबाबाकडे पेशव्यानें मुझफरखानास आमच्या स्वाधीन करा असें मागणें केलें. पण नबाबानें तें न ऐकतां गुतीकर व सोंडूरकर घोरपड्यांशीं स्नेह करून पेशव्यांशीं लढण्याची तयारी केली. पेशव्यानेंही मोठी फौज तयार करून हैदराबादवाले यांसही बुस्सी फरांशीस या सुद्धां वश करून सावनुरास वेढा घातला. बुस्सीच्या आगीपुढें सावनूरवाल्याचें न चालतां त्याणें हैदराबादवाले व पेशवे यांस शरण येऊन पुष्कळ मुलूख दिला. आणि मुझफरजंग हैदराबादवाले सलाबतजंग यांजपाशीं नौकरीस राहिला. पुढें बुस्सी साहेबाचें व सलाबतजंगाचें वांकडे आलें. पण बुस्सीनें मोठ्या हिमतीनें व चातुर्यानें पुनः आपला दाब सलाबतजंगावर बसविला. मुझफरखानास माझ्या स्वाधीन करा असें त्याचें म्हणणें होतें, पण सलाबतजंगानें हातीं न देतां त्यास आपल्या नौकरींतून काढून टाकिलें. तेथून पुण्यास येऊन मागील फितुरीबद्दल फार फार क्षमा मागून व पुढें असें वर्तन होणार नाहीं अशाबद्दल वचनें देऊन तो पेशव्यांकडे पुनः राहिला. भाऊसाहेबांच्या मनांत त्यास पुनः ठेवूं नये असें होतें. पण नानासाहेबांपुढें त्यांचें त्यावेळीं चाललें नाहीं. पुढें निझामअल्लीकडील इभ्रामखान गारदी यास त्याणीं सोडल्यावर सदाशिवराव भाऊ यांणीं त्यास आपणाकडे ठेविलें. हा इभ्रामखान मुझफर खानाचा आप्त होता. मुझफरखान ह्यावेळीं नुकताच सुरते जवळील एका कोळी राजाचें पारपत्य करून परत आला होता तों त्यास इभ्रामखान यास ठेविलें आहे हें कळलें. व मला काढण्याकरितां किंवा माझ्या डोकीवर यास चढविण्याकरितां भाऊंनीं यास आणिलें असा संशय त्यास आला. त्यावरून त्याणें मारेकरी घालून भाऊंस मारण्याचा बेत केला असें दिसतें.

होणार नाहीं. तो म्हणूं लागला कीं, " माहिती आपण पूर्तेपणीं चाकरी क- रोन आम्हांस थोडा करावा. मी आपली सेवा केली असेल. तीच याद- रीक दुसरियास देऊं केली, म्हणोन हटानें मजवर तूफान घेतलें आहे. माहिती माझी मोट बांधोन हत्ती पुढें टाकावी. खरा नसलों तरि मारला जाईन." अशा कितीयेक गोष्टी सांगितल्या. तेव्हां त्याचें समाधान करून लावून दिल्हा. जर करितां तेव्हांच मारावा तरि पुरता चौकशी न करितां उगाच मारिला असा लौकिक जनांत होईल. यास्तव ते प्रसंगीं दम खाऊन लावून दिल्हा. घरास जावयास निरोप दिल्हा.

दुसरें दिवशीं यासि आणोन पुसलें. तेव्हां तो बोलिला कीं, खुणा क्षणा आपण कशास पुसतां ? नबाबाचीं पत्रें सांपत आलीं तीं बजिन्नस संदुकांमध्यें आहेत, असें सांगितलें. तेव्हां मुद्दा खरा झाला. पारपत्य करावें, बोभाट झाला तरि पळून जाईल, यास्तव अगोदर बिन हत्यार शिंदे यांचे वाडियांत सर्वत्रांनीं यावें हा पंथ घातला होता; दररोज परामृषास येत होता त्याप्रमाणें मुजाफर- खान हैदरखान उभयतां दरबारास आले. [तेव्हां] देवडीवर हत्यार ठेवावीं म्हणोन आज्ञा जाली. त्या प्रमाणें हत्यार पोरग्यापाशीं ठेवून दोघेही आंत आले. भाऊसाहेब पडद्या आंत होते. हे बाहेर येऊन बसले तेव्हां खुणास आणोन बोलाविला. आणि जामदारांनीं दोघांस धरून मुसकया बांधिल्या. तेव्हां मुजा- फरखान बोलिला कीं, " चौकशी तुम्हीं केली नाहीं. आपण आम्हांस कढई- मध्यें टाकावें. खरे असलों तरि जगून निघूं." परंतु ऐकिलें नाहीं. तेथें दोघांसही ठार केलें. पायांत दोर लावून ओढून टाकिलें. खुन्यासही ढाले- पाशीं नेऊन मारिला. ते दिवशीं अक्राजणांचीं [?] ते समयीं यांचींही डोचकीं मारिलीं. आणि दोन हजार फौज घर कैद करावयास पाठविली. घर हस्तगत करून माल सरकारांत दाखल करून, बायका, मुलें सिंहगडावर घातलीं.

त्या नंतर दो रोजांनीं कूच करून मजल दरमजल नगराचे रोखें चालिलें. नगराचा किल्ला घेऊन नगरांत ठाणें आपलें बसवावें याजकारितां आगोदर पुणियाचे मुक्कामींहून राजश्री त्रिंबकजीपंत विनीवाले यांजबरोबर दहा हजार फौज देऊन पाठविले होते. परंतु किल्ला हस्तगत झाला नाहीं. बाहेर शह देऊन

५. यासि=खुनी यास, जांवयास

६. बजिन्नस=जशींच्या तशींच, खुद्द तींच.

७. संदूक=पेटी.

८. ' खुणा ' असेंच मूळांत आहे. खुनी असें असावें

९. ग्रांटडफ म्हणतात मुजफरजंगानें आपणावर आलेला आरोप कबूल केला व लगेच त्याचा जीव घेतला. ह्या फितुरांत एक परभू गृहस्थही होता. त्यास कैद क- रून एका डोंगरी किल्यांत टाकिलें. परंतु " आकरा असामी ह्या कामांत होते " अ- सा त्यांच्या लेखांत उल्लेख नाहीं.

बसले होते. खांशी स्वारी येते असें पाहून किल्लेदार यांणीं सल्याचें बोलणें लाविलें. काहीं द्रव्य अपणांस द्यावें, पुढें सर्वस्वी चालवावें, आणि आपल्याकडेस ठेवावें, ऐशीं बोलणीं घातलीं. त्या प्रमाणें मशारनिल्हे यांणीं भाऊसाहेबांस लेहून पाठविलें. त्यांणीं श्रीमंतांस लिहून पाठवून मान्य केलें. चाळीस हजार रुपये शिबंदी खर्च ठराव नक्त देऊन किल्ला घेतला. उभयतां खांसे नगरास[११] आले.

तेथें वर्तमान ऐकिलें जे, नवाब निजामअल्ली यांणीं चाळीस पन्नास हजार फौजबंदी करून बेदराहून या प्रांतीं येतात. त्रिंबक किल्ला नगर वगैरे घेतले, हे आपले माघारे घ्यावें, नाहीं तरि बिघाड करावा. लढोन मरावें. याउपर मराठे यांस दबोन रहावें, हें उत्तम नव्हे. हा निश्चय करून मजल दरमजल येत आहे. ऐशीं वकिलाचीं पत्रें आलीं. त्यावरून श्रीमंतांस विनंतीपत्रें पाठविलीं कीं, आम्हीं मोंगलाचे तोंडावर जातों. साहेबीं कुलें[१२] फौजांस ताकिदी करून वरचेवर लोक आम्हांकडे पाठवावे. अपणही कूच करून नगरावर यावें, ऐशीं पत्रें पुण्यास श्रीमंतांकडे पाठवून अपण दरकूच उदगिरीचे रोंखें चालिलें. नवाब निजामअल्ली हजार फौजेसुद्धां उदगिरीवर येऊन मुक्काम केला. राजश्री दादासाहेबीं[१३] ही येऊन आपले फौजेंत मिळोन त्रिवर्गांनीं एकत्र होऊन मसलत केली कीं, उदगिरीवर मोंगल आला आहे, सालमजकुरीं मोंगल परिच्छिन्न[१५] बुडवावा. बहुत दमानें आला आहे, याचें पारपत्य करावें." ऐसा मनसुबा करून श्रीमंतांकडे पत्रें पाठविलीं. श्रीमंत खांसा स्वारी नगरास दाखल जाहाली. वरचेवर त्यांजकडे सरंजाम पाठवीत होते. त्यानंतर इब्राहीमखान गारदी हजार फिरंगी ऐसे जमावानशीं येऊन सामील झाला. भाऊसाहेबीं बहुतांशीं मुजारत[१६] करून बोली उत्तम प्रकारें केली. सेवेंत ठेविलें. बरा मनुष्य मातबर कराराचा याहस्तव अगत्य धरून बक्षीस सीरपाव देऊन पहिले दिवशीं नक्त खर्चास दहा हजार रुपये[१७] दिल्हे. आणि समागमें घेऊन उदगिरीचे मुक्कामीं मोंगलाशीं गांठ घातली. पहिलें जुंज इब्राामखान याणें तोंड लाविलें. ते दिवशीं कांहीं जालें नाहीं, मोंगलापाशीं आगेचें[१८] बळ भारी. उधळून काढिलें. इब्रामखान कस्त[१९] करून

१०. पेशव्यांची बखर पृष्ठ ५९।६० पहा. तसेंच पेशव्यांची शकावली पृष्ठ १७ टीप ५४ पहा.

११. किल्लेदार कविजंग नांवाचा होता. नंतर हुलकडे यांजकडे ह्या किल्याचें काम सांगितलें.

१२. कुल्=सर्व.

१३. दादा तर बिथरले होते. दादा ह्या लढाईस गेल्याचें दुसरे कोठें आढळत नाहीं.

१५. परिच्छिन्न=अगदीं, पुरा.

१६. मुजारत ? समजाविशी ? खात्री. ?

१७. ग्रांटडफ म्हणतात ह्या पूर्वीच इब्रामखान गार्दी यास भाऊंनीं ठेविलें होतें. वर टीप ४ पहा. इब्राम खानाची टोळी पांच हजारांची ह्या लढाईत होती.

१८. आगेचें=तोफखान्याचें.

१९. कस्त=मेहनत. इब्रामखानाचा अगदीं मोड झाला. त्याचीं ११ निशाणें मोंगलांनीं घेतलीं.

मागें आला. मोंगल बळ धरून मजल दरमजल धारूरचे रोखें चालिला. यांणीं फौजेचा बंदोबस्त करून मध्यें मोंगल, उजवे बाजूस [भाऊ] साहेब, डावे-बाजूस दादासाहेब ऐसे दररोज झुंजत होते. धारूरानजीक आ ट क. उभय-तां फौजा पोंचल्या. पुढें त्रिवर्गांहीं मिळोन मनसुबा केला कीं, मोंगल बळ धरून जबरदस्तीनें मारामार करून धारूरास पोंहचतो, मग हातांसें येत नाहीं. अ-ह्मामध्यें कुमक पोंचली नाहीं तों हल्ला करून झुंज द्यावें. यश अपेश ईश्वरसत्ता. परंतु धारूरांत गेल्यावर मग तोलत नाहीं. अशी मसलत करून तमाम सर-दारांस बोलावून रात्रीस सांगितलें कीं, " सर्वत्रांनीं हिंम्या करून उदईक मोंग-लावर हल्ला करावा. बळकट झुंज द्यावें आणि आह्मांस यश द्यावें." प्रातःका-ळीं कूच जालें तेव्हां रोजच्या प्रमाणें मध्यें मोंगल गोळा करून, गोल किल्ला करून, भंवता तोफखाना देऊन चालत होता. सभोंवती आपली फौज नेमणु-केप्रमाणें चालत असे. तों पिच्छाडीचेच तोंडावर घोडे घातले. सर्वत्रांनीं हिं-मत धरून हल्ल्यास उठले. तोफेची रंजक एक झडली. त्या खालीं इब्राम खा-न याजकडील व हुनरातीच्या तोफखान्यांतील गारदद बहुत मारिले. त्यांहीमध्यें बळ धरून मारीतच चालिले. उजवेकडून भाऊसाहेब व रावसाहेब, व डावेकडून दादासाहेब ऐसे मारामार करीत उठले. तेव्हां मारीत खांशाचे हवद्यापर्यंत जाऊन लोक पोंचले. मोंगलांकडील लोक बहुत पडले. युद्ध उत्तम प्रकारें जालें. एक प्रहरपर्यंत खणाखणी जहाली. मोंगल कचरला. हिंमत सोडली. ते दिवशीं आणीक चार घटका दम धरून झुंज दिल्हें असतें तरि मोंगल बुडवून गर्दीस मेळवून दिल्हा असता. परंतु संध्याकाळ होत आला. बहुत लोक पडिले. बराणनी मोहिते व केशवराव पानसे व आणीक कितेक ते दिवशीं ठार जहा-ले. बहुत लोक जखमी जहाले. झुंज जालें ते ठिकाणीं मोंगलानें जवळून मुक्काम केला, आपलाही मुक्काम जहाला. यश आलें. बहुत संतोष जहाला. श्रीमंतांस खुशालीचें वर्तमान पत्रांत लेहून सांडणीस्वार पाठविले. श्रीमंत नगराहून आंबे पडदुरावर अगोदरच आले होते. तेथें वर्तमान ऐकोन संतोष पावले. सांडणीस्वारास इनाम बक्षीस सोन्याचीं कडीं दिल्हीं व पोषाख दिल्हे.

इकडेस वर्तमान लढाई जाली ते दिवशीं संध्याकाळीं मोंगलानें आपल्या-मध्यें विचार केला कीं, गनीमाची फौज भारी आहे. आपल्यामध्यें अवसान राहिलें नाहीं. लोकांनीं हिंमत सोडली, लष्करांत महागाई बहुत जहाली. धारू-रास पोहोंचूं देत नाहींत. याउपर सलुख करितां उत्तम आहे. असा सर्व मसलत-

३०. कारण धारूर येथें मोंगलाची आ- | णखी फौज होती.

दार मिळोन मसलत करून वकील गनिमाकडेस पाठविले. दुसरे दिवशीं वकिलानीं येऊन नबाबाचें बोलणें सांगितलें कीं, "तुमचे वडिलांचा आणि आमचे वडिलांचा स्नेह चालत आला. त्यास संप्रत तुम्हांपासूनच अंतर पडिलें व तुमचे रीतीप्रमाणें तुम्ही चालत नाहीं. पुरातन करार मोडून आमचे किल्ले दरसाल एक दुसरा तुम्हीं घेतच आहां. बरें जें जालें तें उत्तम. याउपरि तुम्हीं किल्ले व मुलुख घेतला आहे तो तुह्मांस मुभा आहे. पुढें तुम्हीं व आह्मी एक मतें चालावें." त्यास यांनीं उत्तर सांगितलें कीं, "पूर्वीं तह खराच आहे. परंतु हल्लीं आम्हांस पातशाहांनीं सांगितलें कीं, तुम्ही गैरसनदी मुलुख खातां. तुमचे मुलुखांपैकीं निमे प्रांत आह्मांस द्यावा. नाहीं तर तुम्हीं आह्मी युद्ध करूं. तुम्हांस आह्मीं मोडिलें तरि तुमचा मुलुख आह्मीं घ्यावा. आणि तुम्हीं आम्हांस मोडिलें तरि आमचा मुलुख तुम्हीं घ्यावा." तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, "तुम्हांस फौजेस खर्च बसला आहे तरि एक क्रोड रुपये देतों." अशीं बोलणीं लावलीं. "आह्मी ऐवज घेत नाहीं. क्रोड रुपयांचा मुलुख द्यावा. याशिवाय किल्ले दवलताबाद द्यावी." असें निखालस वकिलांस सांगितलें. तेव्हां विठ्ठल सुंदर दिवाण याजपाशीं शिक्के कट्यार देऊन यांचे डेऱ्यास पाठविला. किल्ले मुलुख मागितला तो कबूल करून पत्रें करून देणें. त्याजवरून मशारनिल्हेनीं येऊन बहुत रतबदली करून तह केला कीं, दवलताबाद, बऱ्हाणपूर व सालेर व मुल्हेर, अमदानगर एकूण किल्ले सहा. साठा लक्षांचा मुलुख. त्यामध्यें किल्याखालीं जो मुलुख असेल तो वजा करून बाकी जहागीर करार करून घेतली. मोंगलांचीं पत्रें घेऊन राजश्री गोपाळराव गोविंद यांसि मोहिमेस दहाहजार फौज देऊन दवलताबादेस रवाना केलें. दवलताबाद वगैरे किल्ले तहाप्रमाणें घेऊन आपलीं ठाणीं बसवून नबाबाच्या भेटी होऊन हैदराबादेस दरकूच दरमजल मोंगल गेला. भाऊसाहेब व दादासाहेब व रावसाहेब त्रिवर्ग कूच करून आंबपडदुरावर आले. श्रीमंतही तेथें आले. भेटी जाल्या. मोंगलांस तंबी पोंचली. किल्ले मुलुख जहागिर मेळविली. बहुत संतोष जाहला.

त्यानंतर हिंदुस्थानांतून राजश्री जनकोजी शिंदे यांचीं पत्रें आलीं कीं, आवदल्ली गिलचा दुराणी एक लक्ष फौजेनशीं बळ धरून दिल्लीस आला. दिल्लीनजीक दोन कोशावर चाळीस हजार फौजेनशीं दत्ताजी शिंदे होते. गिलच्यानें दिल्ली घेऊन आपल्या तर्फेनें बादशाहा बसविला, म्हणजे आपला अंमल बसेल. अशामध्यें जाऊन तोंड टाकावें म्हणोन दोनशें स्वारांनशीं जाऊन गिलच्याचे फौजेंत मिसळले. तों गिलच्यांची फौज भारी, चहूंकडून वेढा घालून दत्ताजी

२१. गनीम=शत्रु=मराठे.

शिंदे यांजला निघावयास जागा नाहीं असें जालें. जातीनिशीं बहुत तरवार केली. इ-तक्यांत छातीवर गोळी लागली. दत्ताजी शिंदे ठार जाले. तेथेन चढाई करून गिलच्याची फौज शिंदे यांचे फौजेवर आली. तेथें फौज शिंदे यांची व गिल-च्यांची लढाई जाली. जनकोजी शिंदे यांचे दंडावर गोळीचा जखम लागला. फौज कचरली. मोड जहाला. फौजेस पळ सुटला. कत्तल करूं लागले. चार हजार फौज लुटून दस्तें केली. बाकी राहिले ते व जनकोजी शिंदे खासा ऐसे पळत जाटाचें मुलकांत राहिले. ऐसे वर्तमानाचीं पत्रें बसून एके जागां वाचलीं. विस्मय जाला. पुढे हिंदुस्थानांत खासे स्वारी निशीं जावें अथवा फौज रवाना करावी हा मजकूर पडला. दुसरें वर्तमान आलें कीं, गिलचा यमुनानदीपार होऊन दिल्ली-पाशीं आला. दिल्लीस दाखल होऊन हिंदुस्थानांतील सर्व संस्थानिक त्यास सा-मील जाले. दिल्लीचा किल्ला घेऊन, पूर्वील पातशहास काढून आपले तर्फेनें पा-तशहा स्थापिला. आणि दक्षणेस चाल करावयाची उमेद आहे. या प्रांतींचे संस्थानिक कुल त्यांसि सामील जहाले आहेत. नजीबखान रोहिला बारा हजार फौज व सुजाउद्दौला पंधरा हजार आणिक कितेक संस्थानिक ऐसे त्यास सामील जहाले. आपणांकडील ठाणीं अंतरवेदींतील व जयनगर वगैरे देखील मा-ळवा गडबडलीं आहेत. यासमयीं फौजा पाठवून यांस तंबी पोंचली तरि उत्तम. नाहीं तरि परिच्छिन्न ठाणीं या प्रांतींचीं उठतात. अशीं पत्रें मल्हारजी होळकर व शिंदे यांचीं आलीं. तीं वाचून, बहुत दिलगीर होऊन, राजश्री दादासाहेबांची खानगी हिंदुस्थानांत करावी हा सिद्धांत करून श्रीमंत [व] राजश्री भाऊ-साहेब एकत्र होऊन दादासाहेबांस बोलावून सांगितलें कीं, " हिंदुस्थानांत जावें. तुम्हीं गेलें पाहिजे. " तेव्हां दादासाहेब बोलिले कीं, " पूर्वीं आपण तह[२३] केलेत ते साठ लक्ष रुपये कर्ज जहालें. तें वारल्याशिवाय आम्हांस जावयास अनकूल पडत नाहीं. " तेव्हां भाऊसाहेब बोलिले कीं, " मुलुखागिरीस जावें तें कर्ज घेऊन घरास जावें कीं काय ? किंवा द्रव्य मेळवून घरास यावें ? तथापि तिकडील तिकडे लोकांची सम-जाविशी करावी.[२४] " तेव्हां श्रीमंत बोलिले कीं, " दादासाहेबांचें कर्ज वारून जा-ऊं तेव्हां त्यांस मुलुखगिरि सांगूं. सांप्रत आम्हीं जाऊं अथवा तुम्हीं जावें. " तेव्हां भाऊसाहेबींहि सांगितलें कीं, " साहेबीं हिंदुस्थानांत मुलुखगिरीस जावें

---

२२. ' दस्त ' किंवा ' पस्त '

२३. आपण तह केलेत=म्यां तह केले आहेत. नाहीं तर तहांचा भाऊंकडे संबंध येतो आणि भाऊ तर पूर्वीं हिंदुस्थानच्या भानगडींत पडले असल्याचें पहाण्यांत नाहीं.

२४. पण हीं सर्व बोलणीं उदगीरच्या लढाईच्या पूर्वींच होऊन भाऊंनीं मोहीमशीर राहण्याचें काम पतकरलें होतें, असा हल्लीं सर्वांचा समज आहे. दादा उदगीरच्या लढाईंत नव्हते असाही समज आहे. मागें टीप १४ पहा.

[मग] आम्हीं जवळ असोन काय करावें ? आम्हांस आज्ञा द्यावी. आजच कूच करून जातों." ऐसें बोलोन, आज्ञा घेऊन, तेच दिवशीं कूच करून, आंबेपडदुराहून स्वार होऊन बऱ्हाणपूरचें रोखें चालिले. तीन कोशांवर डेरे दिल्हे. मुक्काम जाला. राजश्री विश्वासरावही समागमें चालिले. चार दिवस मुक्काम होता. सौभाग्यवती गोपिकाबाई भाऊसाहेबापाशीं जाऊन बहुत प्रकारें सांगितलें की, "तुम्हीं जावें ऐसें नाहीं. दादासाहेब म्हणतील तें कबूल करून त्यांची खानगी करावी. आपण येथोन त्यांस सरंजाम पोंहोंचता करावा. येणेकरोन बहुत उपयोग आहे," असें सांगितलें, परंतु विचारास आलें नाहीं. गोपिकाबाई फिरोन आंबेपडदुरास आलीं.

पुढें यांणीं कूच करोन फौजेची समजाविशी करीत करीत आठवे दिवशीं बऱ्हाणपुरास दाखल जाले. तेथोन मजल दरमजल नर्मदेवर गेले. तेथें आंठ मुक्काम जाले. हांडिया मुक्कामीं इब्रामखान गारदी होता तो आपला सरंजाम करून दहा हजार गारदी व फिरंगी घेऊन आला. त्याचें इमान घेऊन बराबर समागमें घेतला. पुढें कूच दरकूच माळव्यांत दाखल जहाले. सुरंजेचे मुक्कामींहून फौजेची गणती घेतली. सत्तावीस हजार फौज व शंभर तोफा गणती न.ली. अगोदर दादासाहेबीं पन्नास तोफा माळव्यांत ठेविल्या होत्या त्याही घेतल्या. आणि मजल दरमजल ग्वालेरीस गेले. तेथें चार मुक्काम जहाले. तेथोन कूच करून मजल दरमजल खळ्या पार होऊन चालिले. नदी उतरून ढवळपुरास पोंहोंचले. पंधरा मुक्काम आषाढमासीं तेथेंच जहाले. राजश्री मल्हारजी होळकर [व] जनकोजी शिंदे अंतरवेदीमध्यें होते तेथोन त्यांणीं पत्रें पाठविलीं कीं, "साहेबीं पुढें न यावें. आमच्या कुमकेस फौजा पाठवाव्या. धन्यांचे नांवावर आम्ही यांचे पारपत्य करून पराभव करूं. खासा स्वारी आलियानें आब जातो." असें कितेक प्रकारानें लिहिलें. परंतु यांचे विचारास आलें नाहीं. या प्रांतीचा भेद सांपडेल म्हणून येऊं नका म्हणतात, अशी कल्पना चित्तांत आणून उत्तर पाठविलें कीं, "गिलच्याचें बळ भारी आहे. तुम्ही व आम्ही एकत्र जाल्याखेरीज तोलत नाहीं." त्याजवरून शिंदे होळकर यमुना उतरून आलीकडे आले. पांच सहा दिवसांत गंभिरा नदीवर गेले. उभयतां येऊन भेटले. आंठ मुक्काम तेथें जालियावर सुरजमल्ल जाट पांच सहा हजार फौजेनशीं पलीकडे राहिला. त्यांच्या यांच्या भेटी जाल्या. होळकर यांचे विद्यमानें जाटानें मनसुबा सांगितला कीं, "दिल्लीचा शहरपना आपणास द्यावा गाजुदीखान यास वजीरी द्यावी, आणि शिंदे होळकर आम्ही मिळोन गिलच्यावर

२५. मूळांत ' आज ' असें स्पष्ट आहे पण तें हस्तदोषानें पडलें असावें.

२६. येथें ही ' आज ' असें स्पष्ट आहे

जातों. आमची कुमक आपण बरोबर करावी. आणि आपले मुलकांत उत्छाह करून रहावें. खाशानशीं मिलच्यावर जाऊं नये." परंतु तो विचार यांचे ध्यानांत आला नाहीं. [जाट] होळकर यांचे अनुमतें बोलतात ऐसें मनांत आणून त्यास सांगितलें कीं, " येविशी श्रीमंत राजश्री नानासाहेब यांची आज्ञा पाहिजे. सांप्रत तुम्ही व आम्ही मिळोन हस्तनापुरास जाऊं."

ऐसें सांगोन कूच करून वद्य त्रयोदशीचे दिवशीं स्वार जहाले. ते तिसरे दिवशीं आमावस्येस आगरियानजिक गोघाटास यमुनास्नानास मुक्कामास गेले. तेथोन कूच करून मथुरेस गेले. तेथें मसलत करून शिंदे होळकर व हुजुरात आठ हजार अशी खडी फौज बळवंतराव यास मोघम देऊन पुढें रवाना केलें. पांचवे दिवशीं पोंचले. तेच दिवशीं बळवंतराव जाऊन दरवाज्यावर उभे राहिले आणि पलाण निशाणें शर्त करून किल्यावर चढविलीं. आणि श्रीमंतांकडे सांडणीस्वार रवाना केले कीं, किल्ला फत्ते जाला. श्रीमंत खुषी बहुत जाले. सांडणीस्वारांस इनाम दिल्हें. इकडे निशाणें चढविलीं. कितेक लोक किल्यांत जाऊन पोंचले. पातशहाचे जनानखान्यांत मराठे लोक जाऊन लुटालूट करूं लागले. तेव्हां पठाण किल्यांत सात आठ हजार होते. त्यांणीं शिपायगिरी करून मार तर्वी दिल्ही. लोक, निशाणें माघारीं फिरविलीं. लोक आंत गेले होते ते कापून काढिले. तेव्हां किल्याभोंवते मोर्चे बसवून दिल्ली आलीकडे दो कोशांवर डेरियास आले. फिरून माघारे आले यांचें वर्तमान श्रीमंतांस लिहिलें. वर्तमान ऐकून बळवंतराव याजवर रुष्ट जहाले. निशाणें चढविलीं, कितेक लोक आंत जाऊन पोहोंचले असतां, खासे लोक खटाट करून उड्या घालून पठाण लोक कापून काढावे तें न केलें. असें बोलून आपण कूच करून आठवे दिवसांत दिल्लीस दाखल जहाले. मोरचा एक होता. परंतु उपाय कांहीं चालत नाहीं. श्रीमंत आपणावर एक दोन उठावण्या करून पाहिल्या. परंतु दिल्लीचा किल्ला हातीं यावयास कांहीं यत्न चालत नाहीं. काय करावें हा विचार श्रीमंतांस पडला. आंतील पठाण यांसि विचार पडला कीं, असे समयीं आम्हांस गिलच्याची कुमक येऊन पोहचली तरि उत्तम. नाहीं तरि यमुनानदी भरून चालली आहे; भाऊसाहेब किल्ला घेतल्याखेरीज उठत नाहींत, आम्ही मारले जातों. असा विचार करून किल्याची सल्याचीं बोलणीं यादुदीखान याचे विद्यमानें लाविलीं कीं, " वस्तभाव हत्यारें सुद्धां आम्हांस नदीपार करून द्यावें; म्हणजे किल्ला तुमचे हवालीं करूं." यांणींही मान्य करून ऑठशें पठाण यमुनेमध्यें नाव घालून पार करून दिल्हे. पातशहा मात्र किल्यांत राहिले. जुंजतें माणूस गिलच्याकडील

२७. वर तर " आठ हजार " पठाण म्हटले आहे.

कोणी राहिले नाहीं. किल्ला हस्तगत जाला. ठाणे आपले बसविलें; नारो शंकर यांचे स्वाधीन दिल्लीचा कारभार करून बाळोजी पगडे व मीरखान ठोके व लोक मिळोन सातें आठशें स्वारांनिशीं दिल्लीत ठेविले.

दिल्ली फत्ते जालियावर सुरजमल्ल जाट याणे पूर्वीप्रमाणे शहर आपले स्वाधीन करावे, ह्मणोन आड घातली; यांणीं मान्य न केलें. यास्तव जाट आपले देशास गेला. गाजुदीखान कुराण पढत होता. श्रावणमास संपूर्ण जाला. कोटयांचे आलीकडे यमुनातीरीं हस्तनापूरचे आलीकडे मुक्काम होता. पुढे खर्चाची निकड लागली. यामुळे पादशहाचें तख्त होतें त्याजखालीं छपपाच्या कांबीवर त्याच्या पेट्या किल्या बसविल्या होत्या त्या काढून, सात लक्षांचा ऐवज काढून लोकांस रोजमुरे दिल्हे. आणि भाद्रपदमासीं हा मुक्काम सोडून दिल्लीनजीक दोन कोशावर पश्चिमेकडे सीतारामाचे शहरांत राहिले. उत्तरेकडे दिल्लीचे बाजूस चवकीस दमाजी गायकवाड, दक्षिणेकडे समशेर बहादूर, पूर्वेस गिलच्यांचे तोंडावर हुजुरात व खासा पागा, डेरा, व हुजरातीचे पतके, व जनकोजी शिंदे फौज सुद्धां त्यांचे जवळ हिंदुस्थानी लोक सभोंवते नेमून, बंदोबस्तीनें लष्कर आवळोन अशा जागां जागां चवक्या नेमून भाद्रपदमास पावेतों मुक्काम जाला; गिलचा यमुना नदी पलीकडे एक कोशावर होता. मध्यें नदीमुळे उभयतां फौजेचीं हत्यारें न होतां; भाऊसाहेबीं जनकोजी शिंदे यांचे अनुमतें मनसुबा केला कीं, कुंजपुरामध्यें कुतुमशाहा पठाण व शाहामतखान बारा हजार पठाणानिशीं ठाणें बळकावून आहेत. पूर्वी दादासाहेबास खासे गेले होते, परंतु ठाणें हस्तगत जालें नव्हतें. गिलच्यानें घेऊन यांसि तेथें ठेविलें आहे; आधीं ठाणें घ्यावें. पुढें नदीचें पाणी उतरल्यावर गिलच्याची सुरत घ्यावी;

अशी मसलत करून आश्विन शुद्ध १ पदेचे दिवशीं कूच करून; कुंजपुऱ्याचे रोखें एक मजल जाऊन, फौजेची निवड करून; शिंदे; होळकर व विठ्ठल शिवदेव असे पुढें रवाना केले. मागें एका मजलेचे अंतरें खासा स्वारी व इब्राहमखान गारदी असे दरकूच दरमजल चालले. पुढें फौज गेली. हे तेथें जाऊन पोहोंचले. परंतु नजीक मोरचे देऊन राहिले. इलाज चालेना. आंतून गोळा गोळी होत होती. दशमीचे दिवशीं खासा स्वारीनिशीं कुंजपुरानजीक दिढा कोशावर मुक्काम करून भाऊसाहेब व रावसाहेब घोड्यावरून उतरून, डेरियास जाऊन; पाणी मात्र प्राशन करून स्वार जाले, आणि निशाण फौजेपुढें घालून, किल्यानजीक जाऊन राहिले. तों बातमीचें वर्तमान ऐकिलें कीं, गिलच्याचीं पत्रें किल्लेदारास आलीं तीं धरून आणलीं

आहेत. पत्रांत मजकुर पहातां कुतुबशहा यास लिहिलें होतें कीं, एक दिवस तुम्हीं धीर धरून बसणें. कुमक इतकियांत हर इलाज करून पाठवितों. हें वाचून यांणीं निकड करून इब्रामखान गाडदी मागें सहा कोशांवर होता त्याजला जलदीनें स्वार पागेचे पाठविले कीं, पत्र पावतांच स्वार होऊन येणें. आम्हीही कुंजपुऱ्यास पोंहचलों. ते दिवशीं रात्र जाली. दुसरे दिवशीं सर्वत्रांस ताकीद करून किल्यावर हल्ला केली. इब्रामखान रातोरात कूच करून प्रातःकाळींच दाखल जहाले. परभारें येऊन किल्यास झगडला. श्रीमंतांनीं इब्रामखान यांस सांगोन पाठविलें कीं, मुहूर्तास तीन घटका अवकाश आहे, तूर्त न उठावें. त्याणें सांगोन पाठविलें कीं, मुहूर्त कशास पाहिजे? आम्ही किल्ला फत्ते करितों आणि हुजूर येतों. साहेबीं धीर धरून एक प्रहर बसावें. परंतु यांणीं ऐकिलें नाहीं. सर्वत्रांस ताकीद करून हल्लयास उठले. आंतील पठाणांनीं मार कुँवल दिला. परंतु मारामार करीत लोकांनीं मरदुमी करून खंदक उडून किल्याचे भिताडावर जाऊन पोहोंचले. ते दिवशीं शिंदे यांणीं तरवार सीमा परती केली. कुतुबशाहा व शाहामतखान खंदकाचा आश्रय करून होते तेथें जाऊन लोक पोहोंचले. पठाण कापून काढिले. शाहामतखान याचें डोचकें मारून आणलें तें भाल्यास लावून लष्करांत फिरविलें. कुतुबशाहास जीवंत धरून आणिलें. त्यास नेऊन ढाले[३०]पाशीं त्याचें डोचकें मारिलें. वरकड बारा हजार पठाण कत्तल करून कापून काढले. किल्ला फत्ते जाला. कांहीं गल्ला व कांहीं ऐवज बिच्छायदी दहा पंधरा लक्षांचा सांपडला. किल्यामध्यें बळवंतराव यांस ठेवून आपण मुक्कामास आले. तेथें बातमी आली कीं, नदीपार कुंजपुरानजीक पांच सात हजार फौज गिलचाची आली होती, [पण] किल्ला घेतला हें वर्तमान त्यांणीं ऐकून निघून गेली.

या नंतर पौर्णिमेपर्यंत तेथेंच मुक्काम होता. कुंजपुरास खाणत्या लाविल्या. भिताडें किल्याचीं फोडिलीं. साफ करावयास लागले. आणि कुरूक्षेत्रास जावें, तेथें दर्शन करून माघारें यावें, हा मनसुबा करून आश्विन वद्य प्रतीपदेस कूच करून कुरूक्षेत्राचे रोंखें चालिले. तेथें वर्तमान आलें कीं, गिलचास यमुनेनें वाट दिल्ही. गळाभर पाणी जालें. नदी उतरून सडी फौज उतरली. तोफखाना मात्र उतरावयाचा राहिला होता. तोही उतरावयास लागला. असें वर्तमान ऐकतांच कुल् सरदारांस रात्रीं बोलावून मसलत केली कीं, आधीं जाऊन

२८. कुवल=मजबूद, जबर.

२९. 'विशमनखान' असें मूळांत दिसतें पण वरतीं शाहमतखान असेंच आलें आहे. पुढेंही असेंच म्हटलें आहे.

३०. ढाल=झेंडा, मुख्य निशाण.

गिलच्याचा मुक्काम घ्यावा. तोफखाना वगैरे फौज नदीपार झाली नाहीं तों गांठ घालावी. सरंजाम जमल्यावर तोलणार नाहीं. म्हणोन कूच करोन पाणिपताचें रोखें द्वितीयेचे दिवशीं बारा कोशांवर पु ला व र मुक्काम केला. दुसरे दिवशीं सहा कोशांवर मुक्काम केला. बुणगे मागें राहिले होते याजमुळें केला. तेथें बातमी आली कीं, पाणपतावर पुढें तीन कोशांवर गिलचा आला. तिसरे दिवशीं कुल् बुणगे झाडून आले. आल्यानंतर कूच करून पाणिपतावर दाखल जाले. तेथें वर्तमान आलें कीं, गिलचा सोनपतावर आला. सोनपतावर ठाणें सरकारचें होतें तें दहशतीनें उठोन आलें. पानपतावर मुक्काम जाला.

दुसरे दिवशीं सडी फौज बाजी हरी समागमें देऊन पुढें त्यांचे लष्करानजीक बातमीस पाठविला होता. झाडी मोठी. गिलच्याचें लष्कर दिसत नाहीं, आपणांकडील स्वार लष्करानजीक जाऊन घोड्यांवरून उतरून हुरडा खात बसले होते. तों तिकडील पन्नास पाऊणशें स्वार आले. त्यांणीं मध्यें गवसून पंचवीस स्वार धरून नेले. त्यांपैकीं तीन मराठे व एक ब्राम्हण, ऐसे चवघांचीं डोचकीं मारलीं. वरकडांचीं घोडीं हत्यारें घेऊन जिवानशीं सोडले. उघडे बोडके लष्करांत आले.

त्यानंतर गिलचाकडील स्वार तोफखाना झाडून नदी उतरून लष्करांत मिळाले, कुल् स्वार एकत्र होऊन राहिले, म्हणोन वर्तमान आलें. पूर्वीं गिलच्या नदी उतरेल म्हणून कुंजपुराकडे जाते समयीं दीडशें नाव शि ल म गडाजवळ अटकावून ठेविली होती. परंतु ईश्वरचरित्र ! नदीस उतार जाला. त्याजमुळें फौज उतरून आली. लष्करा नजीक तीन कोशांचे अंतरानें राहिली, आपलें लष्कर पाणिपताचा जुना खंदक मातबर होता तेथें पश्चिमेकडे मागें बुणगे, पुढें सड्या फौजा, निवड करून राहिल्या.

प्रथम जुंज शिंदे, होळकर यांणीं स्वतां केलें. आपला तळ सोडून त्यांच्या लष्करावर चालून गेले. तेही वाढून पुढें आले. जुंज मातबर होऊं लागलें. त्यांचे कुमकेस सोनजी भापकर वगैरे पतके बळवंतराव यां समागमें देऊन पाठविले. ते आपला तळ सोडून एका कोशांवर फौज सुद्धां[३१]–शिंदे होळकर ऐसें जुंज होत आहे. शिंदे यांजकडील लोकांनीं ते दिवशीं शर्त केली. गिलच्याचा मोड होऊन माघारे गोटांत नेऊन घातले. पांच सहाशें घोडे आणिले. शिंद्याकडील शेटिबा खराडे व सटवाजी फाळके पडले, गिलचाकडील साहेब लोक मातबर दोन चार पडले. [३२]वगैरे बहुत ठार जाले,

---

३१. फौजसुद्धां– काय केलें ? वाक्य अपुरें दिसतें.

३२. वगैरे=इतर या अर्थी.

कांहीं एक जखमीही जाले. ते दिवशीं सुजाहित डवला, नजीबखान रोहिला पुढें आला होता. कैस्त[33] करून माघारा गेला. ते दिवशीं बळवंतराव गणपत यांणीं कमी केलें. शिंदे यांची कुमक केली असती तरी गिलचा पांच सात हजार हलका जाला असता. तो न जाला. परंतु यश मराठे यांस आलें.

गिलचाकडील फौज अबदाली खांसा वीस हजार देखील[34] मातबर, नजीब खान रोहिला बारा हजार पायदळ व सुजात डवला पंधरा हजार, या शिवाय फिरकोळ पंचवीस हजार, एकूण साठ पन्नास हजार. सुजा डौला यांजकडील व नजीबखान याजकडील तोफखाना लहान थोर शंभर सवाशें जमला. ल हा न फौज [?] आपणाकडील फौज हुजुरात पागा देखील पतके सुमारी तीस हजार व जनकोजी शिंदे कुल् बारा हजार व मल्हारजी होळकर आठ हजार व हिंदुस्थानांतील पतकें तीन हजार. एकूण जुंजती फौज पन्नास साठ हजार. व इब्रामखान गारदी पायदळ तोफखाना. शिवाय इब्रामखान लहान थोर होते. आंब्याचे बागेंत खांसे पागासुद्धां, उजवे बाजूस जांबळीचे बागानजीक जनकोजी शिंदे, त्यांचे उजवे हातीं मल्हारजी होळकर, त्यांचे उजवेकडे पेंढारी. होळकराचे पिच्छाडीस रेणको आपाजी व यशवंतराव पंवार, डावे बाजूस इब्रामखान गारदी व समस्त सरदार, त्यांचे डावेकडे दमाजी गायकवाड व मानाजी पायगुडे व बाजी हरी व विठ्ठल शिवदेव व नारायणराव बापूजी व कृष्णाजी अनंत व तांबे व कितेक पतकें अशा बाजू वांटून देऊन, फौजेची बंदोबस्ती करून, बुणग्याचे भंवता बाहेरून तोफखाना, कुल् सभंवता खंदक आपले मसलतीनें सर्वांकडून खंदक खचविला. पहिला कांहीं जुना होता तो सरसावून नीट केला. कार्तिक शुद्ध १ पासून लढाईस प्रारंभ केला. तोफेचे गोळे चालूं लागले. गिलचाकडील फौजेचा बंदोबस्त, पिच्छाडीस खांसा अबदाली, पुढें त्याजकडील पठाण, डावे बाजूस सुजात डवला व उजवे बाजूस नजीबखान रोहिला. याप्रमाणें एका मागें एक राहिले होते. त्यांचे पुढें कांहीं अर्ध कोशावर फौज कांहीं समागमें देऊन पुढें ढाला देऊन मोरचे दिल्हे. तोफखाना उभा करीत होते. आपले लष्करा पासोन त्यांजकडील तोफखाना एका कोशावर होता. तेथोन गोळे येऊन आपले लष्करांतील कितेक घोडे व माणसें मरत होतीं. आपला बंदोबस्त ज्या ठिकाणीं पतकें राहिलीं तेच मोरचे कायम केले. पुढें मोरचा चालू येता [?] आपणांकडील तोफेचे गोळे त्यांचे लष्करांत दिढा कोशावर जाऊन पडत होते. आपले लष्करावर

---

३३. कस्त=श्रम, मेहनत.

३४. देखील मातबर=मातबरांसुद्धां, मोठे सरदारांसुद्धां.

अर्धे कोशावर धमामा रचून, वरत्या तोफा लागू करून, तेथोन मार करूं लाग-
ले. आपले गोळे दररोज शें दोनशें त्यांचे लश्करांत पडतात. त्यांजकडील
चाळीस पन्नास दररोज येतात. आपले छबिने चार पांच हजारांच्या टोळ्या
पुढें जात होत्या. त्यांजकडीही फौजेच्या टोळ्या पुढें येतात. त्यांचा यांचा मुका-
बला होत होता. कांहीं झडपड होऊन हे इकडे येतात व ते तिकडे जातात.
आपल्याकडील कही कावाड जाई त्याजवर दंगा करूं लागले. तट्टू माणसें
धरून नेऊं लागले. तेव्हां बंदोबस्त करणें प्राप्त जाला. दररोज चार हजार
फौज कहीचे समागमें देऊत गवत मात्र आणीत होते. सरपणाचें साहित्य
कोठें आंब्याचे वृक्ष होते ते तोडून गंज घातले. पांचा स्वारांचा लोक
पतकी त्याणें एक दुसरा वृक्ष आटोपिला. मातबर सरदारांनीं तर बहुत
आटोपिले. आपले आपले ठिकाणीं गंज घातले.

त्यानंतर आपलेकडील पेंढारी त्यांचे लश्करांत जाऊन दंगा करूं लागले.
तेव्हां त्यांणीं फौज पाठवून कैंहीस उपद्रव केला. पांच हजार कही धरून
नेली. पन्नास असामींचीं डोचकीं मारिलीं. तट्टे हिरोन घेऊन वरकडांस सो-
डिलें. त्यापासोन कलह मातबर होऊं लागला. आपले लश्करांत प्रथम धारण
कमकसर बारा शेर धान्य होतें. त्याच्या लश्करांत महर्गता चार शेरांची धारण.
तेव्हां गिलचानें पहिला मुक्काम सोडून यमुनातीरीं जाऊन राहिला. त्याचे
लश्करांत अंतरवेदीकडील रसद चालूं लागली. बाराशेर धान्य जालें. आप-
णाकडील रहदारी बंद केली. त्याजमुळें महर्गता चार सहा शेरांची जाली.
त्याजमुळें लोक बहुत गडबडले. कुरुक्षेत्राकडून रसद चालवावयाचा प्रकार
करावा असा विचार करून मुलकांतील चारण बोलावून त्यांस बहुत मान वस्त्रें
देऊन कौल द्यावा; तमाम संस्थानिकांस पत्रें देऊन मार्ग चालता केला. तेणें-
करून दहा शेरांची धारण जाली. चारणासमागमें पांच हजार स्वार देऊन
दहा बारा कोशांवर घालवावे, येते समयीं पुढें स्वार पाठवून आणावे, असें
केलें. चारण पंचवीस तीस हजार बैल भरून दाणा वगैरे जिन्नस घेऊन येऊं
लागले. तेणें करून कांहीं एक दिवस धारण राहिली. दररोज धांडोरा पि-
टीत गिलचावर चालोन जावें लागतें. त्या समयीं त्यांणीं तयार होऊन
यावें. तेव्हां फौजा पुढें जात. परंतु तो जागा सोडोन चालो [न] नये.
तेव्हां जुंजास अनकूल पडलें नाहीं. गिलचाकडील बातमीचे लोक येत.
त्यांणीं सांगितलें कीं, " आपणाकडील फौजांचा बंदोबस्त औ ब सोडून

३५. कही=दाणा वैरण नेणारी टोळी.
३६. रसद=दाणावैरणीचा पुरवठा.
३७. 'आब' असें स्पष्ट आहे. 'भाराया- तर' नव्हे ?

पुढें येऊन जुंज करावयास खाशाचा हुकूम नाहीं. तुम्ही दररोज चालून गेला तरी खासा शाहा बाहेर येत नाहीं. लष्कराचा अवघा घोळ आटपून पुढें तोफखाना देऊन राहिला आहे. जुंज द्यावयास खासा बाहेर निघत नाहीं."

[तेव्हां] यांणीं दोन्हीं लष्कराचे मध्यें रणखांब उभा केला. आणि भंवताली पळसाची झाडी कितेक होती ती पतक्यास वांटून देऊन, रात्रीच्या मशाला लावून दर पतक्यास दोनशें चारशें झाडें तोडावयास नेमून देऊन झाडी तोडली. मैदान रान केलें. आणि त्यास जासुदाबरावर सांगून पाठविलें कीं, हिंमत धरून जुंजास यावें. म्हणून त्याजवरून रणखांबाचे इशारतीनें कार्तिक वद्य १० चे दिवशीं तयार होऊन झाडून फौजा घेऊन खासा निघून गांवा बाहेर आला. हें वर्तमान यांस कळलें. यावर हेही दररोज तयार होऊन येत होते, त्याप्रमाणें तयार होऊन दहा घटका दिवसास थोडक्या लहान गोळ्याच्या तोफा समागमें घेऊन, तमाम सरदारांस ताकीद करून तयार जाले. आणि तमाम धमार्थ्यांपाशीं जाऊन उभे राहिले. सर्वत्र सरदारांस सांडणीस्वाराबरोबर सांगोन पाठविलें कीं, आपला जागा सांभाळून रहाणें. ज्याजवर येईल त्याणें जुंज द्यावें. जेथील तेथें कायम असावें. कोणाचे मदतीस कोणीं जाऊं नये. म्हणोन ताकीद करून पुढें अर्ध कोश फौजा पुढें गेल्या. तेही तिकडून चालून आले. त्याणें हल्यास पुढें चाल केली. शिंदे होळकर यांजकडे उजवे बाजूस सुजात डवला, हुजुरात डावे बाजूस नजीबखान रोहिला वगैरे पठाण. खासा शाहा पाठीमागेंच राहिला. प्रथम जुंजाचें तोंड सुजात डवला याणें हल्ला होळकराकडे लावला. तों होळकराकडील लोक कुल् पळों लागले. जुंजास ठरत नाहींत. होळकरास संकट पडलें. तेव्हां आपण घोडियावरून उतरून गाशा टाकोन बसला. आणि लोकांस म्हणों लागला कीं, "तुम्हीं सर्वत्र पळोन जावें आणि आपले जीव वांचवावे. आम्हीं येथें मरतों. आमचें डोचकें त्याजला कापून नेऊं द्या. तुम्हीं पळतां त्याप्रमाणें वाट धरावी." म्हणून बसला. त्याजवरून लोकांनीं माघारीं तोंडें केलीं आणि शिपाईगिरी म्हणावी तशी केली. ते दिवशीं होळकरानें डवला यास माघारें फिरवून दिल्हें. जुंज उत्तम प्रकारें जालें. तिकडून दम खाऊन नजीबखान रोहिला यांजकडे येऊन मिळाला, दोघे एकत्र होऊन हुजुरातीवर आले. डावे बाजूचीं पतकें हललीं नाहींत. तीं जेथील तेथें कायम होतीं. इब्राहिमखान गारदी हुजुरातीस सामील होता. हुजरातीकडे खाशावर उभयतां चालून आले. युद्धास तोंड लावलें. ते समयीं बळवंतराव पंचवीस स्वारांनिशीं पुढें सरकला. बळवंतराव यांजकडील लोक

---

३८. खंदकाच्या बाहेर भाऊंनीं मातीचा बांध तोफा चढविण्यासाठीं घालविला होता | तो—धमामा.

भले सरदारासमागमें उठले नाहींत. लोकांनीं कमी केलें. आणि खांसा दहीं-विसांनशीं जाऊन हत्यार फार केलें. बळवंतराव यांचे कुमकेस हुजुरातीचें लोक कुल् जाऊन मिळाले. जुंज बळकट होऊं लागलें. दिवस थोडा राहिलों. बळवंतराव यांस छातीवर गोळी लागली. ठार झाला. घोडियाखालीं पडला. तों तिकडील लोकांची दाटी करून, घोड्या खालीं उड्या टाकून, डोसकें कापून न्यावयासि आले. ते समयीं हुजरातीच्या दहापांच लोकांनीं हिंमत बळकट धरून पुढें होऊन, मोठ्या जबरदस्तीनें दहा पांच त्यांजकडील असाम्या ठार करून, पायाशीं धरून मुर्दा ओढून आणिला. बळवंतराव पडला हें वर्तमान फौजेंत कळतांच लोकांनीं दहशतखाऊन मांघारे कचरले. जरीपटका पन्नास ५० स्वारांनशीं राहिला. तों रोहिला लढाई करीत करीत धमाण्यापाशीं चालून आला अगोदर लोकांस ताकीद होती त्यामुळें कुमक केली नाहीं. रात्रही फार झाली. धमाण्या पासून कचरून हुजरातीचे लोक कितीक गोटापर्यंत जाऊन दाखल जहाले. त्या समयीं भाऊसाहेबीं छातीचा कोट करून, जेथील तेथें उभे राहून माघारे फिरते त्यांजवर काठ्या घालून तोंडावर लावीत. आपण जाग्यावरून हालले नाहींत. त्या समयीं जनकोजी शिंदे हाणा हाणा करीत रोहिल्याचे फौजेंत मिसळले, आणि कुबल मार दिल्हा. डावे बाजूस इभ्रामखान याणें शर्त करून जाऊन तोंड लाविलें, मध्यें पाहिले तोंडींच तिहींकडून गारदी याणें खणाखणा केली. रोहिल्याचे लोक कापून काढिले. खांसा रोहिला माघारें तोंड करून पळूं लागला. त्या तमयीं सुजात डवला याणें कमती करून हत्यारें केलीं नाहींत. खांसा शाहा तो मागेंच होता. पुढें आला नाहीं. रोहिल्यास कुमक पोहोचली नाहीं. खराबी बहुत जाली. चार घटका रात्र परियंत जुंज जालें. ते दिवशीं दिवसाचें जुंज असतें तरि गिलचा परियंत मारीत जाते. शें पन्नास निशाणें आणिलीं व हत्यारेंही आणिलीं. हत्यारें तळावरही बहुत पडलीं. त्याचे पाठी लागोन त्याचे मोरच्यापर्यंत घालविलें. रात्रीं दिसेनासें जालें. यामुळें फिरून माघारे आले. ते दिवशीं जनकोजी शिंदे यांणीं बहुत मर्दुमकी केली. जुंज उत्तम प्रकारें जालें. नर करितां ते समयीं भाऊसाहेब माघारें तोंड करिते म्हणजे कांहीं बाकी न रहाती. मोठें धीरानें लोक फिरवून जुंजें केल. यामुळें लोकांनीं डोया देऊन शिपाईगिरी म्हणावी तैशी केली. रोहिल्याचा मोड होऊन माघारा आपले लष्करांत जाऊन मिळाला. श्रीमंतांस यश आलें. संतोष जाला. परंतु बळवंतराव पडिले यामुळें श्रम जाले. प्रहर रात्रीस भाऊसाहेब व रावसाहेब

३१. हा लेख भाऊंस अनुकूल आहे.

चांदणीस दाखल जहाले. व कित्येक लोक जखमी व ठार जाले त्यांचा समाचार आणोन सर्वत्रांचा परामृष केला. आणि बळवंतराव यांचे डेऱ्यास जाऊन, त्यांची बायको सहगमनास तयार झाली होती, तिजला बहुत प्रकारें समाधान करीत होते. परंतु तिनें निश्चय केला. तेव्हां साहित्य करून रवानगी केली. रात्रीचेंच दहन केलें. आपण चांदणीस आले. दुसरे दिवशीं तमाम सरदारांचे डेरियास जाऊन बहुतां प्रकारें समाधान केलें. लोक संतोष जाले. त्यामुळें पुढें लढाई करून खामाखाय गिलचा मोडून काढावा याप्रमाणें सर्वत्रांनीं बळ दिल्हें. आणि स्वारी तयार केली.

तों गिलच्यांचे लष्करांतील बातमी आली कीं, कालच जुंजांत रोहिल्याकडील वगैरे पांच हजार लोक पडले. गिलचापाशीं जाऊन रोहिला याणें पागोटें आपटिलें कीं, " माझें सर्वस्वी घर बुडविलें. नामी नामी सरदार पडिले. खराबी बहुत जाली. तुह्मीं कुमक केली नाहीं. या उपर आपण आह्मांस तोंडीं देतां. आपण निघून जातां. " [ऐशा] कितेक रागाच्या गोष्टी बोलून रूदन करीत बसला. तेव्हां शहानें बहुत समाधान केलें. शिरपाव दिल्हा. व कितेक सरंजाम देऊन डेऱ्यास घालविला. असें वर्तमान शिंदे यांचे मुखें ऐकिलें. ते दिवशीं सुजात दवला याजकडील पठाण मातबर आला. सलुखाची बोली लाविली. परंतु रोहिला या बोलींत नाहीं. दवला याणें कांहीं अबदालीचें अनुमत घेऊन वकील पाठविला. करारांत निश्चय अटकेपर्यंत मुलुख घ्यावा. व शिंदे यांची मालत नेली ती घ्यावी आणि एक क्रोड रूपये नक्त घ्यावें व दिल्लीचा बंदोबस्त तुमचा तुह्मीं करावा. अशी बोली पांच सहा रोज पर्यंत होत होती. यांणीं बोलणें केलें, परंतु रोहिला आमचे हातीं द्यावा. अशी आट यांची होती. गोळी वाजतां राहिली नाहीं. तोफांचा मार तिकडून व इकडून पूर्ववत् प्रमाणें होतच होता. लोक छबिन्यांस जातच होते. जुंज मात्र जालें नाहीं. बोली दोन महिने घातली. रोहिल्यास कळल्यावर शहापाशीं जाऊन म्हणों लागला कीं, " तुमचे सोबतीनें आमचा खराबा बहुत जाला. कांहीं बाकी राहिली नाहीं. एक वेळां मी जाऊन लढाई करीन, मग तुह्मीं सख्यत्व करावें. तूर्त आपण या मनसब्यास रजावंत नाहीं. " त्यावरून अबदालीनेंही कान पाडिलें. रोहिल्याकडील वकील उठोन गेले.

---

४०. चांदणी = छत, तंबु, डेरा.

४१. रोहिला नजीबखान.

४२. छबीना = पहारा. (घोडेस्वारांचा.)

४३. रजावंत = कबूल, खुषी.

४४. 'कान पाडले' तर नव्हे ?

४५. हीं तहाचीं बोलणीं कालहरण करण्या करितांच अबदालीनें सुरू केलीं असावीं. तह करण्याचा त्याचाही मनोरथ नव्हता.

पुन्हा पूर्ववत् प्रमाणें जुंज होऊं लागलें. असें करितां लहान थोर जुंजें दोन महिनेपर्यंत जालीं. पावणे तीन महिने मोर्च्यावरच होते, आणि भाऊसाहेब चांदणीवर येत स्नान भोजन करून मोरच्यावर गेले म्हणजे ते[४६] माघारे येत. ऐसें नित्य चालीप्रमाणें जाहलें. वर्तमान वरचेवर श्रीमंतांकडे लिहून पाठवीत. बळवंतराव पडिल्यावर लहान लहान जुंजें वरचेवर होतच होतीं. परंतु दिवसों-दिवस गिलचा बळावत चालिला. त्याचे लष्करांत संवगाई, आपले लष्करांत महागाई, दिवसोंदिवस होत चालली. यास्तव हरएक प्रकारें सख्यत्व करून सांप्रत निघावें हीच मसलत. याजकरितां श्रीमंतांकडे पुण्यास पत्रें पाठविलीं कीं, आपले लष्करांत धारण फार महाग जहाली आहे. सरंजाम कोणीकडून पोंहचत नाहीं, यास्तव आब राहून सलूख करून प्रस्तुत निघावें कीं काय? त्याचीं उतरें श्री-मंतांनीं पाठविलीं कीं, तह कोणत्याप्रकारें, मुलुख कोठपर्यंत, आपणांकडे काय देतो, व नक्त ऐवज किती देतो, हें लेहून पाठवणें. मनास आणून आज्ञा करणें ते केली जाईल.

या नंतर लष्करांत लोकांस रोजमुरा नाहीं, खजीना कोणी कडून येऊं पावत नाहीं, यास्तव गोविंदपंत भाऊ बुंदेले यांस पत्रें पाठविलीं कीं, सरंजाम आह्मांकडे हरएक विचारें करून पोंचता तुह्मीं करावा, तें होत नाहीं. तरि गि-लचाकडे अंतरवेदींहून रसद येऊन पोंचती, त्यास जागां जागां लोक घालून, वाटा बंद करून, सरंजाम न पोंहचे तें करावें. त्याजवरून गोविंदपंत त्या का-मावर चार पांच हजार फौजेनिशीं अंतरवेदींत फिरत होते. तेंव्हां गिलचानें बातमी राखून गोविंदपंताचे पारपत्यास लंगडा नजीबखान पठाण दहा हजार फौज देऊन यमुना नदी उतरून अंतरवेदींत रवाना केलें. नदीपार त्याणीं मुक्काम केला. तेंव्हां इकडे वर्तमान कळल्यावर गोविंदपंतांचे कुमकेस जावया-करितां नारो शंकर यांस पत्रें पाठविलीं. दिल्लीमध्यें नारो शंकर या समागमें श-हरचे रखवालीस मीरखान पठाण व बाळोजी रोकडे देखील नारो शंकर सातशें स्वारांनिशीं होता त्यास व आपाजीपंतास हुजूर लष्कर नारायण बापूजी ते रा ह जा र ल खे णी बो ध णे तीनशें, पर्वतराव कदम दीडशें, व लक्ष्मणराव गावडे पन्नास, हिरोजी शेळके पन्नास अशीं पतकें साडे अठराशें स्वार दिल्लीस रवाना केले. आणि त्यांस सांगितलें कीं, गोविंदपंत अंतरवेदींत आहेत त्याजवर गिलचानें फौज रवाना केली, त्यास तुह्मीं व नारो शंकर व दिल्लींतील लोक जाऊन कुमक करणें. लंगडा पठाण लुटून पैस्त[४७] करणें ह्मणोन रवाना केलें

४६. ते म्हणजे रावसाहेब विश्वासराव.

४७. 'पस्त' किंवा 'दस्त'?

हे दिल्लीस जाऊन पोंहचले, तों गिलचाकडील फौजेनें जाऊन गोविंदपंताशीं गांठ घातली. संध्याकाळचा चार घटका दिवस होता तेव्हां जाऊन फौजेंत मिसळले. त्याची फौज भारी होती. यांणीं कोणीं हत्यारें धरलीं नाहींत. गोविंदपंतांनीं पळ काढिला. तीन वेळां घोड्यावरून पडिले. फिरून वरचेवर बसवीत. धीर पुरेनासा झाला. लोक चहूंकडे पळों लागले. दिल्लीहून कुमक कांहीं पोंचली नाहीं. ते समयीं गोविंदपंत सांपडले तेथें शिरच्छेद केला. आणि सुजा इवला याजकडे शीर पाठविलें. फौज लुटावयास लागले. कितेक लोक मारले व कितेक गेले. घोडीं बहुत पडिलीं. चारपांचशें घोडीं घेऊन गेले. कितेक पळोन अंतरवेदींत गेले. कितेक देसचे लोक दिल्लीकडे पळत आले. दोन चार हजार पर्यंत दिल्लीस दाखल जहाले. सुजाइवला याजकडेस शीर पाठविलें होतें. त्यांणीं श्रीमंतांकडे पाठविलें. श्रीमंतांस अपेशाचे श्रम जाले. शिरातें दहन करविलें.

या नंतर कुरुक्षेत्राकडून आपणाकडील चारण येत होते त्यांची बातमी राखून गिलचानें दोन हजार फौज पाठवून चारण लुटावयास सांगितलें. ही बातमी कळल्यावर विठ्ठल शिवदेव यांजकडील हजार स्वार **ग र न** ळ्यावर पाठविले कीं, चारण आला असला तरि त्याजला पुढें घालून लावून देणें. आणि तेथेंच गिलचाची बातमी राखून रहावें. त्याजवरून स्वार **गरन**ळ्यावर जाऊन राहिले. कांहीं चारण रवाना केले. पुन्हा गरनळ्यास होते. त्या स्वारांस लिहिलें कीं, " चारण जमा झाला असेल तितकाच घेऊन येथें येणें, तेथें राहिल्याने गोविंदपंतांची अवस्था होईल. " परंतु ते फिरोन माघारे आले नाहींत. गिलचास वर्तमान कळलें कीं, " यांचे लष्करांत चार शेरांची धारण जाली. जे चारण कुरुक्षेत्राकडून येतात, त्यांजवर दोन हजार फौज पाठविली आहे परंतु तोलत नाहींत. गरनळ्यावर बसवून चारण पुढें घालून आणितात." त्यास फौज पाठवून द्यावी ह्मणोन आणिक दोन हजार फौज पाठविली. पहिली दोन हजार [होतीच.] हे व ते एकत्र होऊन कांहीं चारण लुटून नेले. दाणे यावयाचे बंद जाले. तेणें करून लष्करांत महागाई बहुत जहाली. दर रुपयास ८।९ शेर धान्य जालें. सर्व जिन्नस तीन दिवस याप्रमाणें जालें. अन्नाविणें माणसें मरों लागलीं. तेव्हां श्रीमंतांकडेस पुण्यास पत्रें पाठविलीं कीं, " लष्करांत महर्गता बहुत जाली आहे. सरंजाम येऊन पोंहचत नाहीं. अद्यापि सलूख करून निघावें कीं काय ? तह चमेलीपर्यंत मुलुख आह्मीं घ्यावा व पुढें अटकेपर्यंत चवथाई घ्यावी. गिलचानें निघोन आपले मुलखांत जावें. येणें प्रमाणें करार केला आहे. आज्ञा होईल त्या प्रमाणें निश्चयांत आणूं.

याचें उत्तर पाठवावें." श्रीमंतांनीं उत्तर पाठविलें कीं, "दहशत खाऊन सलूख करावा, त्यास दादासाहेबीं लाहुरापर्यंत कांहीं मुलुख काबीज करून आपलीं ठाणीं बसविलीं होतीं, तो मुलुख त्यास द्यावा आणि फक्त चवथाई घ्यावी, येणें करून दादासाहेब तुह्मांस हंसतील, असें न करावें. गिलचास मारून लुटून पराभव करावा. अटकेपर्यंत मुलुख आपला करावा. सदयत्व एकंदर करूं नये. त्यास नीट दिसेल तैसें करणें. खांसा स्वारी तयार होऊन कूच दरकूच तुमचे कुमकेस दाखल होत आहेत. चिंता न करावी." ऐसें लिहिल्यावर सल्याचा मनसुबा करण्याची गोष्ट तो राहिली. त्यानंतर भाऊसाहेबांस न कळतां रावसाहेबांनीं विनंतीपत्र लिहिलें कीं, "गिलचांचा पेंच भारी पडला आहे. उलगडत नाहीं. आह्मांसारिखे पुत्र आहेत व पुढेंही होतील, परंतु भाऊ सारिखा बंधु मिळणार नाहीं. अशा प्रसंगीं खांशानशीं येऊन कुमक करावी." ह्मणोन. त्याचें उत्तर "आह्मीं जलद येऊन पोहोंचतों." असें पाठविलें, आणि पुण्याहून कूच करून पैठणावर गेले. लोक वरचेवर जमा करून दादासाहेब व आपण खासे देखील हिंदुस्थानचे कुमकेस जावयाचा निश्चय करून पैठणास जाऊन दाखल जहाले. पुढें मजल दरमजल जाणार,

या नंतर पाणिपताकडील मजकूर, महागाई बहुत जाली. तेव्हां मसलत करून शिंदे, होळकर यांस सांगितलें कीं, "तुह्मीं खांशा फौजेनशीं जाऊन चारण बहुत आणावें. गरनळ्यास लोक ठेविले आहेत, त्यांणीं लिहिलें आहे कीं, मातबर फौज आल्याखेरीज चारण एकही येत नाहीं. अन्नामुळें लष्कर मेलें जाईल. ह्मणोन त्याजवरून शिंदे, होळकर दहा हजार फौजेनशीं चारण आणावयासि गेले. हें वर्तमान गिलचास समजल्यावर नजीबखान रोहिला व सुजायत डवला पंधरा हजार फौजेनशीं त्यांचे पाठीवर गेले. त्यांची यांची गांठ गरनळ्याचे मैदानांत पडली. तोंडास तोंड लागलें. चारण पन्नास हजार होता. तो सांभाळून पुढें घातला. आणि ते येत असतां रोहिला व सुजात डवला याणें गांठ घालून लढाई केली. चारण लावून देऊन त्यांशीं जुंज दिल्हें. उधळून मुक्कामापर्यंत घातले. आणि चारण सांभाळून आणिलें. त्यामुळें दीडशेर धारण जाली. धान्य मिळत होतें. पुढें ज्याचें नांव अन्न मिळेनासें जालें. अन्नामुळें घोडीं माणसें मरूं लागलीं.

पुढें खजीना इकडून कांहीं येत होता त्यास गिलचानें मनसुबा करून

---

४८. असें पत्र भाऊसाहेबांसारख्या अभिमानी पुरुषांस लिहिल्यावर मग परिणाम काय विचारावा? या पत्रानें तो मानधन [illegible] चढून त्याचा निश्चय पूर्णपणें दृढ झाला असावा. पण अशीं पत्रें नानांकडून गेल्याचा दाखला अन्यत्र मिळत नाहीं.

दिल्लीचा मार्ग बंद करावा म्हणजे हैरास येतील या विचारें पहिल्या मुक्कामीं हून तळ सोडून दिल्लीकडे मुक्काम केला. दिल्लीस खजीना इकडून स्वार आणावयास गेले होते. त्यास गिलच्या मार्गावर राहिला हें ठावूक नाहीं. हमेशा येत होते त्याप्रमाणें रात्रीचा कांहीं खजीना दिल्लीहून घेऊन येत होते. तों वाटेवर त्या लष्करांत पोहचले. रात्र समय, कांहीं न कळे. यांस भासलें कीं, आपलें लष्कर. म्हणोन घोडियांवरून उतरले. थंडीचे दिवस. त्यांचे लष्करांत गोवराचे आगटी जवळ जवळ जाऊन शेकत बसले. गुडगुड्या ओढूं लागले. आपले आपले लष्करच्या गोष्टी बोलत शेकत बसले. गोट कोणाचा म्हणोन एका जणानें पुसलें. तो म्हणों लागला कीं, "हें लष्कर गिलच्या पादशहाचें. तुम्हीं कोण कोणाचे?" तेव्हा अवसानें जाऊन धडपडून घोड्यावर बसले. आणि पळों लागले. त्यांचे लष्करांत आवई पडली कीं, छापा आला म्हणोन त्यांणीं तोफेची सरबत्ती दिल्ही. आपले लोक सांभाळून हे आपले लष्करांत दाखल जाले.

दुसरे दिवशीं सर्वत्र सरदारांस व पतक्यांस बोलावून मसलत केली कीं, "गिलचाचें बळ दिवसेंदिवस बहुत जालें. आपलें लष्कर सडत चाललें, बहुत घोडीं मेलीं. मातबर खासा घोड्यामुळें पायउतारा जाला. एक वेळा हा मुक्काम सोडून बाहेर मोकळे रहावें. दिल्लीचा राबता सोडून दुसरीकडे जावें, पण झाडी मोठी मातबर, मार्ग नाहीं. तोफखाना निभावणार नाहीं. यास्तव दिल्लीच्याच रस्त्यानें जावयास मार्ग उत्तम. परंतु गिलचा वाटेवर राहिला आहे. जाऊं देणार नाहीं. यास्तव बंदोबस्तीनें निघावें. यमुनातीरीं येऊन पांच कोशांवर जाऊन नदी पाठीशीं घ्यावी. पुढें गिलचाचे तोंडावर तोफखाना द्यावा. दिल्ली उजवे बाजूस राखोन दिल्लीहून सरंजाम आणोन सारें लष्कर आबादान करावें. हा मुक्काम सोडून यमुनातीरीं मुक्काम करावा." तेव्हां मल्हारजी होळकर बोलले जे, "गिलचा मार्गावर असतां फाट करून जावयास निभाव कसा होईल?" तेव्हां निश्चय केला कीं, कुल बुणगे सुद्धां जुंज देत, उडवीत, मार देत, मारीत मारीत जावें. आणि मुक्काम केल्यावर चहूंकडून सरंजामही येऊन पोंचेल. लोक आबादान जालियावर पुढें गिलचाचें पारपत्य करूं. हा सिद्धांत केला. तेव्हां शिंदे, होळकर यांणीं सांगितलें कीं, "निभाव जाला तर हा विचार उत्तम आहे. परंतु उद्यांच निघावें ऐसें नाहीं, रविवारीं कूच करून जाऊं." तेव्हां भाऊसाहेब बोलले कीं, "आज मंगळवार आहे, रविवार सहा दिवस आहे. लष्करचे लोक अन्नावीण कितीक मरतील,

४५. हायास=जेरीस.

गिलचाचे लष्करांत जातील, मग जाऊन सार्थक काय ? इतके दिवस लष्करचे लष्करांत धीर पुरत नाहीं, तथापि उदईक कूच करावें. मारावें कीं मरावें." हा सिद्धांत करून समस्त सैन्यास ताकीद करून, कुल् सर्वत्रांनीं स्वार होऊन लढाईस निघावें. आपले आपले बुणगे पाठीशीं घालून सांभाळून आणावें. तळावर कांहीं एक ठेवूं नये. जुंज करून पुढें दिल्लीच्या रोखें जाणें आहे. परंतु युद्धाचे सामानानशीं निघावें.

ऐशी बळकट समस्त सैन्यास ताकीद करून प्रातःकाळीं पौष शु॥ ८ बुधवार स्वारी तयार केली. भालदार चोपदार सरकारांतून जागजागां सरदारांसि बोलावूं पाठविलें कीं, स्वार होऊन लौकर निशाणापाशीं यावें. पुढें तोफखाना इब्रामखान गारदी, डावे बाजूस शिंदे होळकर, उजवे बाजूस वरकड, कितेक पिछाडीस, बुणगे मध्यें, यांप्रमाणें रचना करून गोलचा गोल चालत सहा घटका दिवसा नंतर निशाणें हत्तीवर देऊन नौवत चौघडा सुरू केला. आणि भाराचे भार चालिले. त्या समयीं दिढा कोसावर जाऊन उभे राहिले. आणि तोफखाना मातबर तोफा निवड करून दिल्या. बाकी तोफा सभोंवत्या चालिल्या. तोफांचे मागें गारदी, त्या मागें सड्या फौजा, त्याचे मागें बुणगे, असा तळ सोडून दिढा कोशावर आले. छकडे व गाडे व कितेक सरंजाम न चाले तो टाकला. मोंगल आपले तळावर आवळून तयार होऊन उभे राहिले. भाऊसाहेबांनीं मसलत केली कीं, "आपण नीट चालून मार्गानें जावें. गिलच्या वाट देऊन एकीकडे जाला तरि लढाईचें प्रयोजन नाहीं. मार्ग मोकळा करीत नाहीं तरि मध्यें घोडीं घालावीं. मारामार करून उफळून मार देत जावें." ऐसें मातबर सरदारांस सांगोन निशाणें सोडून चालिले. तोंड लागलें. प्रथम विठ्ठल शिवदेव, येशवंतराव व माणिकराव कापरे कांहींसे वाढून पुढें गेले. त्यांजवर जुंज मांडिलें, तेव्हां ते कचरून माघारे तोफखान्यांत येऊन राहिले. तों दमाजी गायकवाड यांजवर गिलचानें येऊन कांहींशीं मारामार केली. तेही माघारे फिरले. डावे बाजूकडे मुक्कामीं गोटाचे गोट राहिले होते त्याप्रमाणें पतकें होतीं. त्यांजवर खांसा अबदाली त्या जुंजावर डावेकडे होता त्याणें जुंज भारी केलें.

कुल् आपणांकडील पतकें माघारीं फिरलीं. हलके बहुत जाले. इब्रामखान गारदी याजवर खांसा बुरानशाहा व रोहिला याणें चालोन घेतलें. एक रंजक उडाली. तिकडील लोक बहुतेक पडिले. हटला नाहीं. तसेच नेट धरून मारीत आले. इब्रामखान गारदी याजवर चाल पडली. कुमक कोणीं केली

नाहीं. तथापि हुजरातचे लोक एकत्र होऊन संधान साधिलें. [illegible] होत्या. लढाई मातबर एक प्रहर केली. इकडे उजवे बाजूस शिंदे, होळकर यांजवर सुजात दवला व गोसावी वगैरे यांणीं येऊन [घाव] घातले. जुंज मातबर होऊं लागलें. मध्यें भाऊसाहेब व कांहीसे लोक व रावसाहेब हे उभ-यतां घोडियावर सांभाळून होते. भाऊसाहेब पुरी घोडीवर, रावसाहेब दिलपाक घोड्यावर होते. चोहोंकडून लोक सांभाळून होते. जुंजानें तोंड लागलें. मा-रामार होत होती. मातबर लोक पडों लागले. इतकियांत रावसाहेब यांस छातीमध्यें गोळी लागोन ठार जाले. हें भाऊसाहेब यांणीं पाहून [illegible] सोडिलें. बहुतेक शोक करूं लागले. मुडदा उचलून हत्तीचे अंबारीमध्यें घातला. आणि भाऊसाहेबीं निश्चय केला कीं, या उपरि गिलचा खांशांनशीं मारीन ऐसे जाहलें. आणि लोकांस ताकीद करून जुंज लागलें. हाणा हाणा ऐसे मुखें बोलून सर्वत्रांस ताकीद करूं लागले. बरोबर समशेर बहादर होते. ते धरून पुढें जाऊन तीन वेळां मागें हटविलें. त्यांजवर चहूंकडून गिलचानें मार तोफांचा व गोळ्यांचा व शरांचा केला. तेव्हां लोकांनीं हिंमत धरून भाऊसाहेबां बरोबर सरसाऊन शिपायगिरी बहुत केली. रोहिला माघारां फिरविला. हल्ला करून मोड करून माघारां फिरविला. गिलचा खांसा पळ काढून यमुनापार दाखल जाला. शिपाईगिरी भाऊसाहेबांची म्हणावी तैशी जाली कीं, त्याचें नांव शि-पायगिरी. विश्वासराव पडिले. डावे बाजूचे लोक फचरून माघारे फिरले. अ-शामध्यें सांभाळून रोहिला माघारां सारिला. अबदाली पळून नदीतीरीं गेला. लढाईची शर्त केली.

विठ्ठल शिवदेव यांजकडेस पेशजी गिलचे चाकर दोन हजार ठेविले. त्यास इशारतीस भगवे फडकें दिल्हे होतें. तें डोईवर बांधून फिरत होते. ते समयीं विश्वासराव पडिले ही खबर लष्करांत बुणगियांत जाली. लष्कर गडबडलें होतेंच. गिलचे चाकर यांणीं भगवें फडकें टाकून दिल्हें आणि बुणगियांत आवई घातली कीं, लुटूं लागले. बुणग्यानें पळ काढिला. बुणगें पळतें हें पाहून विठ्ठल शिवदेव यांणींही पळ काढिला. आधीं रावसा-हेबांचें वर्तमान ऐकून दहशत खालीच होती. बुणगें पळतें हें पाहून ते पळाले. डावी बाजू रिकामी होत चालली. रोहिला यांजकडील लोकांनीं लुटी-ची धुमाळी मांडली. इकडे जुंज भाऊसाहेबांकडे होतच होतें. उजवे बाजूस शिंदे होळकर यांजकडे जुंज होतच आहे. मारामारी होतां होतां भारी ख-णाखणी झाली. रावसाहेबांचें वर्तमान ऐकोन जनकोजी शिंदे व मुकुंदजी शिंदे यांणीं मोठी मर्दुमकी करून मारामारी करीत भाऊसाहेबांपाशीं आले. तों इभ्रा-

मलांन गारदी याजवर लूट [?] पडली. त्याणें जित्राचा निधडा करून शिपाईगिरी म्हणावी तैशी केली, ज्याचें नांव शिपाईगिरी. कितेक गारदी [खेतांत] आले व कितेक ठार जाले. हुजरातीचे लोक जवळचे पळों लागले. तोफखाना बंद जाला. जातीनिशीं तरवार सीमेपरती केली. जाऊन गिलचाचे लष्करांत मिसळला. दहा पांच ठार केले. भोंवता वेढा गिलचाचा पडला. आंगावर जखमा भारी पडिल्या. ऐसें असतां लढतच होता. प्रयत्न न चाले तेव्हां हत्यारें राहिलीं. धरून नेला. तेव्हां हें वर्तमान श्रीमंतांस कळलें. मल्हारजी होळकर याचे बाजूवरही मातबर जुंज जालें. रेंटत नाहींसें जालें तेव्हां तेही बाजू सोडून निघाले. भाऊसाहेबांचें हेंच तोंडीं कीं, हाणा हाणा हेंच करित असतां जातीनिशीं मोठा हिय्या केला. बहुत जुंज मातबर केलें तें कोठवर ल्याहावें ? सरकारचे मुत्सद्दी तमाम बिलकुल् एकीकडे पळों लागले. सोनजी भापकर यांसि भाऊसाहेब बोलले कीं, " सोनजीबावा हा समय निघावयाचा नव्हे. तुमचा भरंवसा बहुत धरला होता. उभे रहावें. " तेव्हां ते बोलले कीं, " कुल् लोक पळतात त्यांजला माघारें फिरवितों. साहेबांस टाकून आम्ही कोठें जावें ? " ऐसें म्हणोन लोक फिरवावयास म्हणोन गेला तो तिकडेच गेला. तेव्हां मुकुंदजी शिंदे म्हणों लागले कीं, " महाराज, क्षात्र धर्माची शर्त जाली ! याज उपर निघावें हें उत्तम आहे. " तेव्हां भाऊसाहेब बोलले कीं, " मुकुंदजी बावा, आतां कोणीकडे जावें ? काय तोंड दाखवावें ? रावसाहेबांकडे पहावें. " तेव्हां मुकुंदजी शिंदे यांणीं घोडियावरून उडी टाकिली. जातीनें हत्यार करवलें तेथवर केलें. मातबर मराठे धर्माची शर्थ करून ठार जाले. जरीपटक्याचे निशाणाजवळ अगोदर दाटी जाली होती तेव्हां हत्तीवरून उतरून घोडियावर घातलें होतें. निशाण गुंडाळून पळूं लागले. तेव्हां भाऊसाहेबीं शैंहाजणें वाजवावयास आज्ञा केली. फत्ते जाली, शहाजणें वाजतात, याजकरितां तरी लोक माघारे फिरतील. या अर्थी शहाजणें वाजवूं लागले. परंतु ज्यांणीं पळ काढिला त्यांपैकीं कोणी माघारा फिरला नाहीं. भाऊसाहेब व जनकोजी शिंदे व शेपन्नास लोक व रायाचे मुड्याचा हत्ती इतकी बाकी राहिली. त्याज भंवता वेढा भारी पडला. तेव्हां युद्ध बहुत केलें. पूर्वी भारथी अतिरथी महारथी जुंज जालें. त्याप्रमाणें भाऊसाहेबींही लढाईची शर्थ केली. पुढें कांहीं इलाज चालेनासा झाला. त्यानंतर भाऊसाहेब व जनकोजी शिंदे यांची गती काय जाली ती कोणीं पाहिली नाहीं.

---

५०. शहाजणें=मोठे नगारे.

रावसाहेबांचे मुडद्याचा हत्ती व भाऊसाहेबांची बसती घोडी ऐशीं सुजातखवला याजकडे गेलीं.

त्यानंतर सौ पार्वतीबाई यांचे बंदोबस्तास विसाजी कृष्ण जोगदंड यांस मागमें पांचशें धनगर देऊन ठेविले होते. त्यांस आज्ञा केली होती कीं, "आम्ही जुंज करून पार होऊन निघालों तरि यांस घेऊन दिल्लीचे रोखें निघोन यावें. आणि आम्ही पडलों असें वर्तमान ऐकिल्यावर यांस जिवें मारून तुम्हीं निघोन जावें." असा निश्चय खास सांगून त्यांजला रखवालीस ठेविलें होतें. मोड जाला, लोक पळों लागले, ते समयीं विसाजी कृष्ण व लोक यांणीं आपले जीव वांचविले. कोणीकडे गेले हें कळेना. जानू भिंताडा खिसमतगार एकटा राहिला. त्याणें हिंमत धरून आपले पाठीशीं बांधून तेथून बाहेर काढिलें.

त्यानंतर दुसरें वर्तमान जुंजांतून मातबर सरदार व लहान थोर कितेक लोक पळोन आले. ते पश्चिमेकडे जुन्या तळावर खंदकांत येऊन दाखल जाले कीं, भाऊसाहेबी माघारे पळोन येऊन पूर्ववत् प्रमाणें तळ काढून रहातील. या मागें नित्य जुंजांत जात असत तेंव्हां संध्याकाळीं माघारां फिरून येत. त्याप्रमाणें येतील. म्हणून माघारे बुणग्यांसुद्धा येऊन खंदकांत दाखल जहाले. तों तेथील फौज व बुणगे पळतात. तेंव्हां तेथेंही धीर पुरेनासा जाला, मग तेथूनही वाट सांपडेल तिकडून पळत गेले. ज्याचे घोड्यांत जीव होता तो खंदक पार होऊन पाणिपत शहरांत गेला. तिकडून ज्यास मार्ग दृष्टीस पडला तसे निघाले. कितेक गाडे व छकडे व बायका खंदकांतून निघावयाचें जालें नाहीं ते तेथच्या तेथेंच राहिले. ते गिलचाकडील लोकांनीं पाणिपत शहरचा बंदोबस्त करून खंदकांतील माल्त लुटूं लागले. कितेक बायका धरून नेल्या. कितेकांनीं जिवें मारिल्या. तीच गत पुरुषांस. कत्तल करून जिवें मारिलें. व धरून ही बहुत दस्त केले.

प्रातःकाळचे प्रहर दिवसानंतर जुंज लागलें तो तीन प्रहर हाणा मारा हेंच जालें. पृथ्वीनें रक्त प्राशन केलें. हिंदूमध्यें या प्रों जुंज मागें जालें नाहीं व मोडही या प्रों होऊन कत्तल जाली नाहीं. पुढेंही होणार नाहींसें दिसतें. तथापि ईश्वराची करणी कीं, पृथ्वींतील लोक नेऊन त्यांस मारावयाचें केलें. मराठे लोक निर्माण केले. फौजा हटानें कधीं केल्या होत्या ? आपल्या लष्करांत भोंवता खंदक खाणून कोण राहिलें होतें कीं काय ? उत्तम प्रकारें गांठ पडली तरि जुंज द्यावें नाहीं तरि पळोन जावें. हा मराठधर्म पुरातन चालत आला आहे. तेणें करूनच पृथ्वी जिंकिली होती. ते सोडून अविधी धर्माचा स्वीकार

केला. आणि लोक दरोबस्त व घोडीं मारविलीं. ईश्वरसत्ता! उपाय काय!
नाना साहेब व भाऊ साहेब ईश्वरी अवतार धरून या युगीं चरित्र केलें.
त्या नंतर जुंज होतां होतां रात्र जाली. जुंज बंद जालें. हत्यारें राहिलीं.
विश्वासराव यांचे मुडद्याचा हत्ती सुजातउवला याजकडे गेला होता. तेथें दौला
यांजकडील गोसावी शिपाई होता त्याणें लष्करचे पळांपैकीं तैलंग ब्राह्मण
आणून रायाचें दहन करविलें. उत्तम प्रकारें गत करून अस्थि वाराणशीस
रवाना केल्या. पाणिपतांतील लोक शहरांतून दुसरे दिवशीं गांवचे दरवाजे
बंद करून कुल् पळाचा बंद करून दहा-पंधरा हजार पळ धरिला. खंदकांतील
धरले. तेव्हां ताकीद जाली कीं, माणसांस न मारावें. मालत घेऊन सोडून
द्यावें. त्याजवरून दुसरे दिवशीं यांणीं मारलें नाहीं. बंद धरिला होता तो कुल्
तीस हजार पर्यंत लष्करांत आणिला. दोन दिवसपर्यंत लष्करांत होता. त्यास
सुजायत दौला यांणीं गिलच्याशीं तीन लक्ष रुपये खंडणी देऊन धर्मार्थ बंद
सोडून दिला. रणांतील ही शोध सुजायत दौला याणें करून मातबर सर-
दारांची वगैरे लोकांची ओळख निघाली त्यांस नेऊन गत उत्तम प्रकारें केली.

त्यानंतर इकडील पळाचें वर्तमान तरि कितेक घोडियाचे सामर्थ्यें करून दिल्ली-
चा रस्ता ज्यांस सांपडला ते पांच-सात हजार निघोन गेले. त्यांस त्या मार्गें
दांडगे गांवचे भेटले त्यांनीं मारामार करून कितेकांचीं घोडीं घेऊन सोडिलें,
व कितेक जिवें मारिले. त्यामध्यें ज्यांचे घोड्यांस जीव बराच होता ते पांच-सात-
शें वांचून संध्याकाळीं चाळीस कोस दिल्लीस जाऊन दाखल जाले. कितेकांस
दुसरे मार्ग सांपडले, ते भकोन घोळांत पडले. भगवंतें वाट दिल्ही तिकडे
गेले. आयुष्य होतें ते जगले आणि आले.

यानंतर सौ॰ पार्वतीबाई यांस जानू भिंताडा खिसमतगार याणें पाठीशीं
बांधोन आणिलें. पिराजी राऊत पळत होता त्यांणीं पहातांच पाठीची सोडून
आपल्या घोडियावर पाठीमागें बांधोन सहा कोशपर्यंत आणिली. पुढें त्याचा
घोडा थकला. त्यानें उतरून ठेविली. पुन्हा जानू भिंताडा खिसमतगार कोश
अर्ध कोश चालवितो तों वळकट घोड्याचा मातबर सरदार कोणी [भेटला तर]
त्याचे घोड्यावर बसवी. ऐसें करीत करीत तशा संकटानें दिल्ली आलीकडे तीन
मजलावर मल्हारजी होळकर व कितेक सरदार व पागेचे बारगीर व स्वार, शिले-
दार पन्नास भेटले. त्यांमध्यें येऊन भेटली आणि मिळाली.

त्यानंतर दिल्लीकडील मजकूर तरि बुधवारीं अष्टमीचे दिवशीं तिसरा प्रहर
पर्यंत जुंज होऊन मोड जाला. तों गुरुवारीं प्रातःकाळीं कितेक पळत आले.

५१. कुल् पळाचा बंद धरून=सर्व पळालेल्या लोकांस कैद करून.

तेथें कोशावर मीरखान ठोका व बाळोजी पगेडे ऐसे सहा सातशें किल्यांत होते बाकी हुजरातीचे पतके लक्ष्मणराव गावडे व हिरोजी शिरके व लखोजी ढोंबे व बापू बाजीराव यांचीं पतकें पर्वतराव कदम व गोविंदपंत बुंदेले याच्या सूत्रें [!] पांचशें स्वारांनिशीं अशीं तीन सहस्र होतीं. हजार वाळवंटींत होते. त्यांस सर्वत्रांस पळाचें वर्तमान समजलें. परंतु त ह की की कीं कदाचित् भाऊ साहेब पळोन दिल्लींत आले आणि अगोदर पळाले. असें जालें. येणे तोंड दाखवावयास जागा नाहीं. यास्तव धीर धरून रहाते जाले. पेशजी लष्करचे उदमी कितेक बाहेर जाऊन राहिले होते त्यांस त्या शहरांतील भिकारी यांणीं शोध करून लुटूं लागले, व मारूं लागले. वाळवंटींत पतकें होतीं. गुरुवारीं तिसराप्रहर पर्यंत धीर धरून होतीं. कांहीं खजीना ही सरकारचा होता तो अगोदर काढून बाहेरील पतकें व आपण एकत्र होऊन निघाले असते तरि निभाऊन येते. तें न जालें. संध्याकाळीं गंगोबातात्या होळकराचे दिवाण पळतच दिल्लीस आले. नारो शंकराकडे भोजन केलें. सविस्तर मनकूर सांगितला. याउपर जसा मार्ग भगवंत देईल त्याप्रों निघोन पार व्हावें. नीट दिसत नाहीं. तुम्ही डोळे झांकून कां बसलां ? असें नारोशंकर यांस सांगितलें. आणि ते स्वार होऊन गेले. तेंव्हां अवसानें गेलीं. खजीना काढावयास अनुकूल पडलें नाहीं. दिल्लींतील लोक व बायका देखील लष्करच्या लोकांस मारून लुटूं लागल्या. शहरांत धूम जाली. जिवानिशीं मारामार करीत नारोशंकर वगैरे कुल् झाडून निघाले. अगोदर वाळवंटींतील पतकें तीन निघालीं तीं फराडियास जाऊन जीन न उतरतां दमसांड केला. तों ही रातोरात येऊन मिळालीं. त्यानंतर नाना पुरंदरे व बाळोबातात्या व आणीक शें पन्नास तेही आले. तेही एकत्र होऊन तीन मजला आले. तों होळकर यांची व बायकांची गांठ पडली. तेथून मजल दर मजल अकरावे दिवशीं भिंडेस दाखल जाले. इकडील वर्तमान् कितीकांस दिल्लीचा मार्ग सांपडून दिल्लीस येऊन यांचे मागोमाग भिंडेवर आले. वाटेनें कितेक जिवें मारले, कितेक गेले, कितेक लुटून सोडून दिल्हे. दिल्लीच्या मार्ग सांपडला आणि जिकडे गेले. फिरत फिरत तीस-चाळीस हजारांस पांच-पन्नास दांडगे मिळोन लुटून घोडीं हिरावून घेतात. मातबर माणूस अनाथ होऊन पायउतारा जाले. बहुतांस अन्न कोठें मिळेनासें जालें. ऐसे जातां जातां जाटाचे मुलकांत आले. एक मातबर गांव होता तेथें एका सावकारानें भिक्षेस खंडीभर उडीद वांटले. दर मनुष्यास दहा-दहा दाणे आले. आणीक मण दोन मणाच्या भाकरी करून तुकडे वाटले. एक-एकास पैशा एवढा तुकडा

५२. 'पगडे' कीं 'दगडे.'

घाल. अशी [illegible] झाली. [illegible] नाहींत. [illegible] [illegible] [illegible] चालते राहिले. [illegible] तो [illegible] स्थिर [illegible] नाहीं. [illegible] पंढरीचे दिवस, [illegible] [illegible]. नंतर सरदार [illegible] [illegible] होऊन [illegible] [illegible] [illegible] [illegible] येऊन दाखल झाले. तेथें लोटांची [illegible] होती. तिथें [illegible] बहुत [illegible]. [illegible] [illegible] खबर पडतांच [illegible] ताकीद केली कीं, पेशवे लोक येतील त्यांस कोणी छळूं नये. [illegible] [illegible] [illegible] हजार माणसांस सर्वांत आठ आठ रुपयांचें [illegible] दिल्हें. [illegible] [illegible] देऊन दूध, दही, [illegible] दिल्हें. असें एक दिवस [illegible] वर [illegible] पांच [illegible] [illegible] व एक [illegible] व एक [illegible] [illegible] व [illegible] [illegible] [illegible], [illegible] बहुत उत्तम प्रकारें देऊन शहरांत [illegible] [illegible] केले. शहरांत ताकीद केली कीं, [illegible] [illegible] अनुकूल व्हेल असें [illegible] [illegible]. जेथें राहतील तेथें [illegible] [illegible]. कोणी छळूं नये. असें बहुतांस ताकीद करून मातबर कोणी भेटला त्यास [illegible] बंदोबस्त दिल्हें. [illegible] [illegible] दिले. या प्रकारें सर्वांचा [illegible] केला. बहुत लोक आले. तेथून पुढें येतां [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]. [illegible] [illegible] [illegible] [illegible] शिंदे दाखल जाहले. [illegible] [illegible] व होळकर. नाना फडणवीस [illegible] होते. ते सर्वत्र [illegible] झाले. तेथें [illegible] मुक्काम झाला. पेशवे लोक आले, त्यांस सर्वांत पांच [illegible] [illegible] [illegible] दिले. नाना-फडणवीस [illegible] [illegible] भाऊ साहेब यांचे [illegible] पाठविले आणि खूब करून [illegible] झाले.

त्यानंतर नानासाहेब पैठणास आले होते. तेथें [illegible] [illegible] केले. त्यांनी भाऊसाहेब व [illegible] कांहीं फौज देऊन [illegible] [illegible] [illegible] [illegible] केले. आपण दहा बारा हजार फौजेनिशीं कूच करून [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]. तेथें [illegible] [illegible] भोंसले [illegible] देऊन भेटले. त्यांचे बहुत प्रकारें समाधान करून [illegible] [illegible] बरोबर घेतले. पाच सहा हजारांनिशीं तेही [illegible] देऊन [illegible] चालिले. श्रीमंतांसमागमें बापूजी नाईक व [illegible] [illegible] व [illegible] [illegible] व [illegible] [illegible] व गंगाधर बापूजी व [illegible] शिंदे व [illegible] [illegible] होते. [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] दाखल झाले. तीन मुक्काम तेथें झाले. पुढें [illegible] [illegible] करून [illegible] [illegible] तेथेंल [illegible] राजा [illegible] [illegible] [illegible] व [illegible], [illegible], [illegible], [illegible] देऊन [illegible]

५३. [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]
५४. [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

करून चालिले. पार होऊन नर्मदेवर मुक्काम केला. तेथें बंदोबस्त फौजेचा करून पुढें मजल दर मजल सुरंजेवर मुक्काम केला. जानोजी भोंसले व गुजरातीचीं पतकें खेचीवाडेकर बेमान जाले होते, त्यांचे पारपत्यास खेची-वाड्याच्या मुलकांत पाठविलें. श्रीमंत फौजे सुद्धां मुक्कामावर होते. तेथें वर्तमान आलें कितेक पतकींचे लोक उघडे बोडके [आले] श्रीमंतांनीं ऐकोन खेद बहुत केला. श्रीमंतांचा निश्चय पूर्ण कीं, आपण दिल्लीस जाऊन गिलचा मारून टाकावा. असा विचार करून बंदोबस्त केला. त्यास सौ गोपिकाबाई यांणीं बहुत बोध विवेकें करून माघारें फिरविलें. कूच करून मजल दर मजल नर्मदा उतरून ...लीपुरास[५५] आले. इकडील ग्वालेरीहून मातोश्री पार्वतीबाई व नाना पुरंदरे वगैरे लोक येऊन श्रीमंतांस ××× वर्तमान हिंदुस्थानचें सांगितलें.[५६]

---

५५. हें ब्ऱ्हाणपुराचें जुनें नांव काय ? | पंद पुरा नाहीं.
५६. पुढील मजकूर फाटलेला आहे.